कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १४ जून २०२४

किंमत ४ ₹

## समुद्रात बुडून पर्यटकाचा मृत्यू

**अलिबाग :** अलिबाग समुद्रकिनारी फिरण्यास आलेला पुण्यातील पर्यटक गुरुवारी दुपारी समुद्रात बेपत्ता झाला होता. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तो मृतावस्थेत सापडला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अविनाश कृष्णा शिंदे (२८) असे या मृत पर्यटकाचे नाव आहे. हा मुळचा औरंगाबाद येथील रहिवासी असून सध्या पुणे येथील आळंदी येथे राहणारा आहे. पुणे येथील एका कंपनीमधील मित्रांसमवेत तो अलिबागमध्ये फिरण्यास आला होता. दुपारी अलिबाग समुद्रकिनारी पान २ वर

## ‘डेक्कन’ ताळ्यावर

**अलिबाग :** पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी संचलित शाळा कुरूळ येथील आरसीएफ कर्मचारी वसाहतीमध्ये गेली ४३ वर्षे सुरू आहे. आरसीएफचा थळ-वायशेत प्रकल्प सुरू झाल्यानंतर या परिसरात इंग्रजी माध्यमाची शाळा नसल्याने आरसीएफ कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करण्यात आली. शाळा चालविण्याचे संपूर्ण दायित्व डेक्कन एज्युकेशन सोसायटीने घेतले. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून या शाळेसंदर्भात आरसीएफसोबत कराराचे नूतनीकरण करण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पान २ वर

आजचा अग्रलेख
पुन्हा मराठा आंदोलन

### वेधक

## मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

**जालना :** मराठा आरक्षणासाठी आक्रमक भूमिका घेतलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी सहाव्या दिवशी उपोषण मागे घेतले आहे. तसेच सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणी सरकारला १ महिन्याची मुदत दिली आहे. महत्त्वाचे म्हणजे या एका महिन्यात सरकारने मागण्या मान्य न केल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत नाव घेऊन उमेदवार पाडू, असा इशारादेखील त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. सरकारमधील मंत्री शंभूराज देसाई, राणा जगजितसिंह आणि खासदार भुमरे यांनी गुरुवारी (दि.१३) अंतरावाली पान २ वर

## नागपूर : चामुंडा कंपनीत स्फोट

# पाच जणांचा मृत्यू

**| नागपूर | वृत्तसंस्था |**

जिल्ह्यातील वाडीपासून काही अंतरावर असलेल्या धामनाजवळील स्फोटके बनवणाऱ्या चामुंडा कंपनीत मोठा स्फोट होऊन त्यात पाच कामगार दगावले असून आठ ते दहा कामगार जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. दगावलेल्यांमध्ये चार महिला कामगारांचासमावेश आहे. घटनास्थळी गर्दी झाल्यामुळे पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला असून दगावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांचा आक्रोश सुरू होता.




नागपूरजवळील धामना येथे स्फोटके तयार करणारी चामुंडा कंपनी आहे. सकाळी दहा वाजता कंपनी सुरू झाल्यानंतर दुपारी १२.३० च्या सुमारास कंपनीत अचानक स्फोट झाल्यानंतर मोठा आवाज झाला. यावेळी कंपनीत १० ते १२ कामगार कामावर असताना त्यात ५ कामगारांचा कंपनीत मृत्यू झाला तर सात ते आठ कामगार गंभीर जखमी झाले असून त्यांना बाहेर काढण्यात आले आहे. दगावलेले कामगार वाडी आणि धामना परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली असून त्यांचे नातेवाईक घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर त्यांनी आक्रोश सुरू केला. घटनेनंतर लगेचच परिसरातील नागरिकांनी जखमी कामगारांना तात्काळ रविनगरातील सेनगुप्ता रुग्णालयात हलविले असून त्यांच्यावर उपचार सुरू केले आहे.

रुग्णालयात कामगारांच्या नातेवाईकांची गर्दी झाली होती. दरम्यान, कंपनीत स्फोट झाल्यामुळे धामना परिसर हादरुन गेला. आजूबाजूच्या कंपनीतील कामगार घटनास्थळी आले. पान २ वर

## ५.७ कोटींची सुपारी जप्त



**| उरण | वार्ताहर |**

न्हावा-शेवा येथे असलेल्या जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊसमध्ये डांबराच्या नावाखाली आयात करण्यात आलेली ११२ मेट्रिक टन सुपारी एसआयआयबी अर्थात विशेष गुप्तचर आणि तपास शाखेच्या अधिकाऱ्यांनी जप्त केली आहे. या सुपारीची किंमत सुमारे ५.७ कोटी रुपये आहे. या प्रकरणात ६.२७ कोटी रुपयांची करचुकवेगिरी करण्यात आली आहे.

१० कंटेनरमधून ही ११२.१४ मेट्रिक टन सुपारी पान २ वर

## गांजाची वाहतूक करणारे दोघे अटकेत

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

गांजाची तस्करी करणाऱ्या वाहनांवर रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. त्यांच्याकडून १ कोटी १३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यामध्ये १ कोटी रुपयांच्या गांजाचा समावेश आहे. ही कारवाई पनवेल-मुंब्रा महामार्गावरील तळोजा येथे बुधवारी (दि.१३) करण्यात आली असून दोघांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल-मुंब्रा पान २ वर




## शिंदे गटाचा दबाव; भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा

### भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आरोप

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

वरंडे येथील मालकीच्या जागेत अनधिकृत प्रवेश करून काठीने मारण्याची धमकी दिल्याचा ठपका ठेवत शिंदे गटाच्या दबावाने भाजपच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंदे गटाच्या दबावामुळेच प्रकार घडल्याचा आरोप भाजपच्या कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

भाजप आणि शिंदे गटामध्ये देशात व राज्यात गुण्यागोविंदांनी संसार चालू असताना, रायगड जिल्ह्यात मात्र विशेष करून अलिबाग तालुक्यात शिंदे गटाविरूध्द भाजप यांच्यामध्ये शक्ती प्रदर्शन सुरु असल्याचे समोर आले आहे.

अलिबाग तालुक्यातील वरंडे येथे मुंबई येथील एका धनदांडग्याची जागा आहे. गट नं. ३२६, ३६६ व ३७१ या जागेभोवती त्यांनी संरक्षक भिंतीचे काम सुरू केले होते. दरम्यान, भाजपचे कार्यकर्ते यांनी गुरुवारी (दि.६) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास जाऊन तेथील कंत्राटदार व कामगारांना काठीने मारहाण करण्याची धमकी देऊन कामबंद पाडले, असा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात भाजप कार्यकर्त्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून त्या जागेवर गेलो होतो. शिंदे गटाने पोलिसांवर दबाव टाकत गुन्ह्यात मला अडकविले आहे, असा आरोप भाजपच्या पान २ वर

## शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षकांचे धरणे

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करणार आंदोलन

**| तळा | वार्ताहर |**

राज्य शासनाच्या २३ मार्च २०२४ च्या संच मान्यतेच्या धोरणाविरोधात आणि प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १५ जून रोजी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, निदर्शने, आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा अध्यक्ष विजय येलवे यांनी दिली.

राज्य सरकारने संच मान्यतेचा सुधारित नवीन निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर कमी होणार असून अतिरिक्त शिक्षक होण्याचा मोठा धोका या धोरणामुळे पान २ वर



## ग्रामीण पनवेलमध्ये महावितरण कंपनीचा कर्मचारी जखमी

**पनवेल :** ग्रामीण पनवेलमधील आदई गावात ओमकार पुरम या इमारतीजवळ वीज वाहिनीवर दुरुस्तीचे काम करत असताना आगीच्या ठिणग्या उडाल्याने कर्मचारी किरण पाटील यांचा मानेचा भाग जळून ते जखमी झाले. जखमी अवस्थेतील किरण यांना घेऊन परिसरातील नागरिकांनी खांदेश्वरमधील वीर रुग्णालयात दाखल केले. वीज महावितरण कंपनीने किरण यांची नेमणूक वीज सहाय्यक या पदावर आदई परिसरासाठी केली आहे. सध्या किरण यांची प्रकृती ठीक असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

ब्रेकरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने विजेचा एक फेज काही इमारतींना पुरवठा होत नसल्याने किरण हे दुरुस्तीचे काम करत होते. यापूर्वीही अशीच अडचण झाल्यामुळे किरण यांना दुरुस्तीची अनुभव असल्याने ते काम करत असताना दोन फेज संपर्कात आल्याने मोठा शॉर्टसर्कीट झाला. किरण हे शेजारी असल्याने त्यांच्या मानेजवळ शॉर्टसर्कीटमधील ठिणग्या उडाल्या. नागरीक व वीज विभागाच्या इतर कर्मचाऱ्यांनी किरणला वीर रुग्णालयात दाखल केले. वारंवार वीज गायब होत असल्याने आदई गावातील रहिवाशांनी पनवेलचे महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता सतीश सरोदे यांना लेखी निवेदन दिले आहे.

कार्यकारी अभियंता सरोदे यांनी वीज ग्राहकांना वीज अखंडीत देऊ असे आश्वासन दिल्यावर सुद्धा अखंडीत वीज आदई व इतर ६९ गावांना महावितरण कंपनीकडून पुरवठा केली जात नसल्याने वीज ग्राहक संतापले आहेत. विजेचे एक महिन्याचे देयक महावितरण कंपनीकडे न जमा केल्यास वीज तोडली जाते, मात्र अखंडित वीज कधी दिल्याशिवाय महावितरण कंपनीने वीज देयक न भरणाऱ्यांविरोधात वीज तोडणीची सक्तीची कारवाई करु नये, अशी मागणी ग्रामीण पनवेलच्या वीज ग्राहकांकडून होत आहे.

# गोड्या पाण्यातील माशांची मेजवानी

## समुद्रातील मासे बंद झाल्याने खवय्यांच्या उड्या

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

पावसाळा सुरू झाल्याने एक जून पासून समुद्रातील मासेमारी बंद झाली आहे. परिणामी खवय्यांच्या उड्या आता गोड्या पाण्यातील मासळीवर पडत आहेत. हे मासे सध्या बाजारात उपलब्ध होत असल्याने खवय्यांना मेजवानी मिळत आहे.

नद्या, तलाव, धरण, पाणवठे, ओढे, ओहळ, शेतात साठलेले पाणी अशा गोड्या पाण्यात मासे सापडत आहेत. त्यामध्ये मळे, शिवडा, कटला, अरलय, वाम, कोलंबी, खवल आदी माशांचा समावेश आहे. या मोसमात सापडणाऱ्या माशांच्या पोटात अंडी सापडतात. त्याला स्थानिक भाषेत पेर किंवा गाबोळी वाले मासे म्हणतात.



### उधवण किंवा वलगणीच्या माशांना मागणी

भरपूर पावसानंतर पाणी वाढल्यावर खाडीतील तसेच नदीतील मासे शेतातील कमी पाण्यात अंडी देण्यासाठी येतात. यावेळी आलेल्या माशांना पकडण्यासाठी मोठी झुंबड उडते. यालाच उधवण किंवा वलगणीचे मासे असे म्हणतात. पाऊस वाढल्यावर काही दिवसांत सर्वत्र वलगणीचे मासे पकडण्याची लगबग सुरु होईल. असे शिक्षक टिळक खाडे यांनी सांगितले.

> गोडे मासे खाण्यासाठी खूप चविष्ट असतात. सध्या सापडणाऱ्या बहुतांश माशांमध्ये हमखास अंडी असतात. त्यामुळेच माशांना खूप मागणी असते. या हंगामात मासे पकडतो. त्यासाठी जाळे आदी साधनांचा वापर करतो.
> – जितेश जोशी, तरुण मासेमार, पाली

> सध्या गोड्या पाण्यातील मासे खूप मिळत आहेत. शहरात असणाऱ्या नातेवाईकांना आवर्जून भेट म्हणून गोडे मासे नेले आहेत. मळे, शिवडा, कटला व म्हूऱ्या हे मासे अनेकांना खूप आवडतात. –गृहिणी

### किंमत

जिल्ह्यात विविध ठिकाणी वेगवेगळ्या किमती आहेत.
मळे – या वर्षी ५० रुपये पाव तर २०० रुपये किलो, मागील वर्षी ४० रुपये पाव किलो तर १५० रुपये किलो. कोलीम (बारीक कोळंबी) – यावर्षी ४० रुपये वाटा मागीलवर्षी ३० रुपये वाटा (एका पानावर वाटा असतो), म्हूऱ्या – यावर्षी ४० रुपये वाटा मागील वर्षी ३० रुपये वाटा (एका पानावर वाटा असतो) शिवडा, कटला व वाम – या वर्षी ५०० ते ५५० रुपये मागीलवर्षी ४०० रुपये किलो. मोठी गोडी कोलंबी – या वर्षी १००० ते १२०० रुपये मागील वर्षी ८०० ते १००० रुपये किलो.
फंटूस – या वर्षी ३०० ते ४०० रुपये मागीलवर्षी २०० ते २५० रुपये किलो.

# पावसाळी पुठ्ठे विक्रीतून रोजगार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पावसाळ्यात दुचाकी चालवताना चिखल उडून कपडे खराब होऊ नये या करता अनेक दुचाकी चालक समोरच्या चाकाजवळ प्लास्टिकचे मडगार्ड बसवून घ्यायला पसंती देतात. दुचाकी चालकांची ही गरज ओळखून महामार्गांवर अनेक छोटे विक्रेते सध्या प्लास्टिकचे पुठ्ठे विकण्याचे काम करत असल्याचे पाहायला मिळत आहे. ऋतुत होणाऱ्या बदलानुसार वापरात येणाऱ्या वस्तू खरेदीला ग्राहक नेहमीच पसंती देत असतात. ग्राहकांची ही गरज ओळखून अनेक विक्रेतेदेखील ऋतुनुसार दुकाने थाटत असतात.

मागील काही वर्षात त्यात आणखी एका विक्रेत्याची भर पडल्याचे पाहायला मिळत असून पावसाळ्यात रस्त्यावरून उडणाऱ्या चिखलापासून दुचाकीस्वाराच्या कपड्यांचा बचाव व्हावा या करिता लागणारे विविध रंगातील प्लास्टिकचे पुठ्ठे विकणारे विक्रेते परिसरातील महामार्गांवर मोठ्या संख्येने दिसतात.

या पुठ्ठे विक्रीतून दररोज चांगली कमाईदेखील हे विक्रेते करत आहेत.पावसाळा सुरु होताच पाणी आणी चिखल यापासून बचाव करण्याकरता छत्री, रेनकोट, गमबुट, टोप्या या सारख्या अनेक गरजेच्या विविध वस्तु बाजारपेठेत दाखल होत असतात. त्यामध्ये गेल्या काही वर्षापासून महामार्गावर दुचाकी चालवताना उडणाऱ्या पाण्यापासून व चिखलापासून संरक्षण व्हावे या हेतूने विकल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पुठ्ठ्यांचीही भर पडली आहे.पावसाळ्याच्या सुरूवातीला महामार्गावर विविध रंगाचे पुठ्ठे विकणारे विक्रेते दिसायला सरूवात होते.

दुचाकी चालवताना मार्गावरील उडणारे पाणी आणी चिखल उडु नये याकरीता अनेक दुचाकीस्वार आपल्या दुचाकीला हे पुठ्ठे लावताना दिसून येतात. मुंबईच्या मस्जीदबंदर येथील बाजारातून विकत आणलेले पुठ्ठे सायन पनवेल महामार्गावर विकताना राजस्थान, गुजरात येथून आलेले अनेक युवक सध्या दिसत असून, मागील वर्षी ३० ते ४० रुपयांना विकले जाणारे पुठ्ठे यंदा मात्र ५० ते ६० रुपयांना विकले जात आहेत.

# आरोग्यवर्धक शेवळं बाजारात दाखल



**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

पावसाळ्याच्या सुरुवातीला भेटणारी शेवळं ही रानभाजी जिल्ह्यात सर्वत्र दाखल झाली आहे. अतिशय सकस व रुचकर असलेल्या या रानभाजीला सध्या खुप मागणी आहे. यामुळे अनेक आदिवासींना ही भाजी विकून दोन पैसे हाती मिळत आहेत.

जिल्ह्यात सर्वत्र पर्जन्य पडल्यामुळे जंगल व डोंगर भागात शेवळं उगवली आहेत. ही भाजी तयार करण्यासाठी बोंडग्याचा पालादेखील लागतो. कारण या पाल्यामुळे भाजी खवखवत नाही. त्यामुळे आदिवासी महिला शेवळं बरोबरच बोंडग्याचा पालादेखील जुडी सोबत ठेवतात. सध्या २० ते ३० रुपयांना शेवळ्याची जुडी मिळत आहे. खवय्ये उपलब्ध रानभाजीचा आनंद घेत आहेत.

### अशी बनवावी शेवळ्याची भाजी

आधी भाजी निट धुवून स्वच्छ करुन घ्यावी. त्याबरोबरच बोंडग्याचा पाला देखील स्वच्छ धुवावा. त्यानंतर भाजी नीट बारिक चिरुन घ्यावी. कांद्या मसाल्यावर तेलात परतून घ्यावी. किंवा थपथपीत (जाड) रस्सा करावा. भाजीत चिंच, कैरी, आंबोशी किंवा कोकम घालावे त्यामुळे भाजी खवखवत नाही व चविष्ट लागते. आणि गरम गरम चपाती किंवा भाकरी सोबत खावी.

> ही भाजी खाण्यास खुपच चविष्ट असते. तसेच आरोग्यासदेखील उत्तम असते. केवळ याच हंगामात भाजी येत असल्यामुळे घरात आवर्जून ही भाजी बनवितो. घरातील मंडळी ती अतिशय चवीने खातात. सध्या बाजारात लवकरच शेवळ उपलब्ध झाल्याने खुप आनंद होत आहे.
> – लता माळी, गृहिणी, पाली

## मोटारसायकल नेली चोरून

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशनजवळील सिडको पार्कीगच्या बाजूच्या असलेल्या रस्त्यावर उभी करून ठेवलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना शहरात घडली आहे. आकाश घरत यांनी त्यांची ५ हजार रुपये किंमतीचे काळ्या रंगाची हिरो होंडा सीडी ही पनवेल रेल्वे स्टेशनजवळील सिडको पार्कीगच्या बाजूच्या असलेल्या रस्त्यावर उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बंद अंडरपासमुळे उलटा प्रवास

## सायन पनवेल महामार्गावरील कळंबोली येथील अंडरपास दुरुस्तीसाठी बंद

**। पनवेल । वार्ताहर ।**

सायन पनवेल महामार्गांवर कळंबोली वसाहत येथे तयार करण्यात आलेला अंडरपास दुरुस्तीच्या कामासाठी अचानक बंद करण्यात आल्याने वसाहतीमधून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांची तारांबळ उडत आहे.



अंडरपास बंद असल्याने अनेक वाहन चालक उलट्या दिशेने प्रवास करत असल्याने या ठिकाणी अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

सायन पनवेल महामार्गांवरून प्रवास करताना कळंबोली वसाहतीमधून मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी अथवा पनवेल येथून येणाऱ्या वाहनाना कळंबोली वसाहतीत प्रवेश करण्यासाठी कळंबोली येथे अंडरपासची व्यवस्था करण्यात आली आहे.

मागील काही दिवसापासून दुरुस्तीच्या नावाखाली हा अंडरपास बंद करण्यात आला आहे.दुरुस्तीचे काम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही पूर्व सूचना देण्यात न आल्याने वाहनचालकांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## पान १ वरून

### पाच जणांचा मृत्यू

राज्याचे माजी मंत्री अनिल देशमुख यांनी घटनास्थळी पोहोचल्यानंतर घटनेची माहिती घेत प्रशासनातील अधिकाऱ्यांशी व कंपनीच्या मालकांशी चर्चा केली.

घटनासथळी पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला असून दगावलेल्या कामगारांना बाहेर काढण्यात आल्यानंतर घटनास्थळी लोकांचा आक्रोश बघायला मिळाला. दरम्यान, जखमी झालेल्यांमध्ये तीन कामगारांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळाली. अग्निशमन विभागाच्या गाडी घटनास्थळी पोहोचल्या. पाच कामगार घटनेत दगावले असल्याची माहिती समोर आली असून अजून काही कामगार कंपनीत अडकले आहे का, याचा शोध घेत आहे. दरम्यान या घटनेच्या चौकशीची मागणी परिसरातील कामगारांनी केली.

### शिंदे गटाचा दबाव; भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा

कार्यकर्त्याने केला. भाजपला दाबण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडून केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे अलिबाग तालुक्यात शिंदे गटाविरुध्द भाजप हा वाद विकोपाला पोहचण्याची शक्यता आहे. गुन्हा दाखल होऊ नये यासाठी स्वतः भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी रेवदंडा पोलीस ठाणे गाठले. मात्र शिंदे गटाच्या दबावापुढे त्यांचेही काहीच चालले नाही. शिंदे गटातील लोकप्रतिनिधींकडून होणाऱ्या या प्रकारामुळे भाजपमध्ये शिंदे गटाविरोधात नाराजीचे सूर उमटत आहेत.

### शाळेच्या पहिल्या दिवशी शिक्षकांचे धरणे

निर्माण झाला आहे. बेरोजगार युवक असतानासुद्धा या धोरणानुसार सेवानिवृत्त शिक्षकांना कमी पटाच्या शाळेत मानधनावर नियुक्त्या दिल्या जाणार आहेत. तसेच या निर्णयामुळे डोंगराळ आणि आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. शासनाचे हे धोरण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनात अडथळा निर्माण करणारे आहे, असा आरोप जिल्हाध्यक्ष विजय येलवे यांनी केला आहे. शिक्षकांना सततच्या दिल्या जाणाऱ्या ऑनलाईन कामासाठी शाळेत कोणतीही सुविधा न पुरविता शिक्षकांच्या खासगी मालकीच्या मोबाईलचा व डेटाचा वापर कार्यालयीन कामकाजासाठी करण्याची प्रशासनाची मानसिकता वाढत चालली आहे. आज, आता, ताबडतोब याप्रमाणे वेळी-अवेळी सूचना देऊन कामाचा तगादा लावला जातो. अनेक प्रकारची माहिती मागण्याचा हव्यास दैनंदिन शैक्षणिक काम काजात अडसर निर्माण करण्यासोबतच शिक्षकांच्या खासगी आयुष्यात अस्वस्थता निर्माण करणारा ठरत आहे.

शैक्षणिक गुणवत्तेच्या नावाखाली अनेक विविध उपक्रमांचा भडीमार विद्यार्थी आणि शिक्षकांस त्रास करणार आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या जबाबदारीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे दुर्लक्ष होणार आहे. त्यामुळे 'शिक्षकांना शिकवू द्या आणि विद्यार्थ्यांना शिकू द्या' या विद्यार्थी आणि समाज हिताच्या मागणीसाठी शासनाकडे संघटना सातत्याने मागणी करत असूनही यंत्रणा याकडे वारंवार दुर्लक्ष करीत आहे. शैक्षणिक सत्र सुरू होत असताना विद्यार्थी हिताच्या मागण्यांकडे शासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी शाळेच्या पहिल्या दिवशी म्हणजे १५ जून रोजी राज्यभरातील जिल्ह्यात दुपारच्या सत्रात २ ते ४ या वेळेत निदर्शने, आंदोलन करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने घेतल्याचे अनिल नागोठकर व मारुती कळंबे यांनी सांगितले. या शैक्षणिक वर्षापासून शिक्षकांना ड्रेस कोड देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय हा शिक्षकांच्या स्वांतत्र्यावर घाला घालणारा असून शिक्षकांवरील अविश्वास व नकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारा आहे.

जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता या ड्रेसकोडची अंमलबजावणी करणे शिक्षकांना खूप अवघड जाणार आहे. त्यामुळे ड्रेसकोडचा निर्णय शासनाने मागे घ्यावा, अशी मागणी शिक्षक संघटना करीत आहे. राज्यभरात हे आंदोलन होत असताना रायगड जिल्ह्यामध्ये कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता असल्याने १५ जून रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा अध्यक्ष विजय येलवे यांनी सांगितले.

### ५.७ कोटींची सुपारी जप्त

आणण्यात आली होती. आयातीसंबंधित कागदपत्रात या कंटेनरमधील पिंपात बिटुमेन अर्थात डांबर असल्याचे म्हटले होते. वास्तविक भारत हा जगातील सर्वात मोठा सुपारी उत्पादक देश आहे. परंतु देशातील अवैध गुटखा उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात सुपारीची तस्करी केली जाते. या प्रकरणात आयात करण्यात आलेल्या कंटेनर्समध्ये ड्रम्स होते. त्यात डांबर असल्याचे भासविण्यात आले होते. विदेशी पुरवठादाराने यासाठी संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी केल्याचे यावरून दिसून येते. हे सुसंघटित आंतरराष्ट्रीय तस्करी जाळ्याचे द्योतक आहे. त्याचा छडा लावण्यासाठी एसआयआयबीच्या (आयात) पथकाने अथक परिश्रम घेतले. जवाहरलाल नेहरू बंदर, न्हावा शेवा येथे तस्करीला आळा घालण्यासाठी हे पथक कार्यरत आहे.

### गांजाची वाहतूक करणारे दोघे अटकेत

महामार्गावरू एका महिंद्रा कंपनीच्या गाडीतून अंमली पदार्थाच्या साठ्याची वाहतूक होणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पनवेल येथील भरारी पथकाला मिळाली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे उपआयुक्त प्रदिप पवार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे रायगडचे अधीक्षक रविंद्र कोले यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. निरीक्षक आर.डी. पाटणे, उत्तम आव्हाड, दुय्यम निरीक्षक डी.सी. लाडके, एन.जी. निकम, प्रवीण माने, तसेच सहाय्यक दुय्यम निरीक्षक जी. सी. पालवे, महिला जवान आर. डी. काबंळे, निशा ठाकूर, जवान ज्ञानेश्वर पोटे, सचिन कदम या पथकाने बुधवारी सापळा रचला. त्यानुसार गाडी अडवून तपासणी केली असता, गाडीमध्ये १ कोटी रुपयांचा गांजा आढळून आला. यामध्ये चालकासह दोघांना अटक करण्यात आली आहे.

आरिफ शेख (२५) व परवेझ शेख (२९) असे या दोघांची नावे आहेत. त्यांना शनिवारपर्यंत (दि.१५) दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्यात आंतरराज्य टोळीचा समावेश असल्याची शक्यता आहे. त्यामुळे या गुन्ह्याचा अधिक तपास सुरु असल्याची माहिती अधीक्षक रविंद्र कोले यांनी दिली.

### समुद्रात बुडून पर्यटकाचा मृत्यू

फिरत होते. त्यातील अविनाश शिंदे हा पाण्यात पोहण्यास गेला. मात्र भरतीच्या पाण्याचा अंदाज त्याला आला नाही. त्यामुळे दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास तो पाण्यातच बेपत्ता झाला. तेथील स्थानिकांच्या मदतीने अलिबाग पोलीसांमार्फत शोध कार्य सुरु करण्यात आले. पर्यटक पाण्यात बुडाल्याने खळबळ उडाली होती. अखेर सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास महाविद्यालयाच्या मागील बाजूस तो मृतावस्थेत सापडला.पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात पाठविले असून अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### 'डेक्कन' ताळ्यावर

पुणे यांनी अनाकलनीय कारणांनी असमर्थता दाखविली. शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यादृष्टीने करार किमान दोन वर्षे मुदतीने पुन्हा करण्यात यावा म्हणून डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांना आरसीएफ व्यवस्थापनातर्फे लेखी स्वरुपात वारंवार विनंत्या केल्या. मात्र कराराचे नूतनीकरण न करण्याबाबत डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे ठाम राहिली.

शाळा पुर्ववत सुरू करण्याची मागणी विभागीय शिक्षण संचालकांकडे आरसीएफ व्यवस्थापनाने लेखी पत्राद्वारे केली. या पत्राची दखल घेत कार्यवाही करण्याची सुचना शिक्षणाधिकारी यांना दिली. त्यानुसार रायगड जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला पत्र दिले असून शाळा पुर्ववत सुरु ठेवावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन दिवसात सादर करावा अशी लेखी सूचना देण्यात आली आहे. शिक्षण विभागाने डेक्कनला फटकारले आहे. त्यामुळे आरसीएफची शाळा पुर्ववत सुरु राहणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. शिक्षण विभागासह आरसीएफ प्रशासनाकडून केलेल्या सहकार्यामुळे आरसीएफ शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. त्यामुळे पालक वर्गासह विद्यार्थ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### मनोज जरांगेंचे उपोषण स्थगित

सराटी येथे पोहोचत मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षणाबाबत सरकार कशा पद्धतीने काम करत आहे, याबाबतची माहिती त्यांनी मनोज जरांगे यांना दिली. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणीसाठी सरकार दिरंगाई करत आहे, असा गैरसमज मनोज जरांगेंनी यांनी करू घेऊ नये, त्यांनी हा विचार डोक्यातून काढून टाकावा, असे यावेळी शंभूराज देसाई यांनी सांगितलं.

मराठा आरक्षणाचा प्रश्न कायद्याच्या चौकटीत राहून सोडवू, यावर येणाऱ्या हरकती या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवल्या जातील, असे शंभूराज देसाई म्हणाले. तसेच मागील दोन महिने राज्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू होती. त्यामुळे यासंदर्भातील निर्णय घेण्यास विलंब झाला. मात्र, यासंदर्भात उद्या अधिकाऱ्यांची बैठक घेणार आहे. सगेसोयऱ्यांच्या नियमांची अधिसूचना काढण्याबाबत लवकरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी मनोज जरांगे यांना दिले.

दरम्यान, शंभूराज देसाई यांच्या आश्वासनानंतर आता मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले असून त्यांनी राज्य सरकारला एक महिन्याची मुदत दिली आहे. तसेच १३ जुलैपर्यंत आमच्या मागण्या मान्य न झाल्यास, आगामी विधानसभा निवडणुकीत नाव घेऊन उमेदवार पाडू, असा इशारादेखील त्यांनी राज्य सरकारला दिला आहे.

## शुभदा ठाकूर यांचे निधन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे गावच्या शुभदा मोहन ठाकूर यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले.त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांना मेढेखार गावच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार



करण्यात आले. त्यांचे दशक्रिया विधी रविवारी (दि.१६) पेझारी ओंकारेश्वर शिवमंदिरात तर उत्तर कार्य बुधवारी (दि.१९) राहत्या घरी मेढेखार येथे होणार आहेत. त्यांच्या पश्चात त्यांचे पती मोहन ठाकूर, मुलगा रतिश, मुलगी ज्योती व रूपा असा परिवार आहे.

## पेझारी येथे सेवानिवृतांचा जिल्हा स्नेहमेळावा संपन्न

**। तळे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना जिल्हा शाखा रायगड यांचा जिल्हा स्नेहमेळावा पेझारी येथे आयोजित करण्यात आला होता सदर मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्याध्यक्ष मधुकर जंगम हे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी केंद्रप्रमुख सुरेश मोरे हे होते कार्यक्रमासाठी संपूर्ण जिल्ह्यातून अनेक सभासद महिला वर्गासह उपस्थित होते.


सदरच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन जिल्हा सरचिटणीस मारुती निळकर यांनी पाहिले. राज्याध्यक्ष जंगम यांनी सेवानिवृत्तांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे उपस्थित सभासदांना आश्वासन दिले.जि.प. शिक्षणाधिकारी पुनिता गुरव याना फोन करुन वेळेत पेन्शन व गटविमा प्रकरणे निकाली काढण्याबाबत सूचना केली. निवडश्रेणी, सेवानिवृत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख रजा रोखीकरण, सेवानिवृत मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी यांना वेतनवाढबाबत पाठपुरावा शिक्षणमंत्री व ग्रामविकासमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे सांगितले. रायगड जिल्हाध्यक्ष संदीप जामकर यांनी प्रास्ताविकामध्ये सांगितले की, संघटनेने अल्पावधीतच सेवानिवृत्त शिक्षकांची अनेक कामे मार्गी लावली असून ती कामे २०१९ पासून प्रलंबित होती. संघटनेच्या कामाचा लेखाजोगा उपाध्यक्ष निवृत्ती सावंत यांनी सादर केला.

यावेळी राजेंद्र म्हात्रे यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. मुरुड तालुकाअध्यक्ष सुनिल बलकावडे, अलिबाग तालुका अध्यक्ष जयवंत वाणी यांच्या निवडी जाहीर झाल्या. महाड व पोलादपूर तालुक्यातील वंचित सेवानिवृत संख्या ग्रुपवर घेण्याचे यावेळी ठरले. कार्याध्यक्ष देवानंद पिंगळे,खजिनदार सूर्यकांत करंजीकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## मृदुला रोडेचे सुयश

**। तळे । वार्ताहर ।**

तळे येथे रोडे मेडिकलचे मालक सूर्यकांत महादेव रोडे यांची सुकन्या आणि तळा नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत महादेव रोड यांची पुतणी कु. मृदुला हिने आर्किटेक्चर डिग्री हा पाच वर्षाचा कोर्स उत्तम प्रकारे पूर्ण केला असून सुंदर यश प्राप्त केले आहे.



श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सिंहगड, पुणे येथून हा कोर्स पूर्ण करताना प्रथम श्रेणीमध्ये यश प्राप्त करून डिग्री संपादन केली आहे. मृदुला ही लहानपणापासूनच हुशार होती. तिला इ. १० वी परीक्षेत ९२ टक्के गुण मिळाले असून इ. १२ वी मध्येही सुंदर यश प्राप्त केले आहे. शालेय उपक्रमातही सहभाग घेऊन नैपुण्य मिळवीत असे. वडील सूर्यकांत रोडे व आई सुवर्णा यांनी तिला शिक्षणासाठी उत्तम प्रोत्साहन व मार्गदर्शन केले. तिने इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण तळे येथील गो. म. वेदक माध्यमिक विद्यालय येथे घेतले असून पुढील शिक्षण पुणे येथे घेतले. स्पर्धा परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा यामध्येही तिने छान यश प्राप्त केले आहे.

तिचे आजोबा महादेव रोडे हे तळा शिंपी समाजाचे अनेक वर्ष विश्वस्त होते. तर तळा व्यापारी असोसिएशनचे अनेक वर्षे अध्यक्ष होते आजी माधुरी रोडे या जिल्हा परिषद रायगडच्या माजी सदस्य होत्या. आत्या डॉ. नूतन राहुल सुकाळे यांचेही तिला मार्गदर्शन लाभले तर काका चंद्रकांत रोडे हे शालेय जीवनात तिच्या शिक्षणावर लक्ष देऊन असत. ते तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आहेत.

## बेवारस वाहनांचा लिलाव

**पनवेल :** कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत हस्तगत करण्यात आलेल्या दुचाकी बेवारस वाहनांचा लिलाव १८ जून २०२४ रोजी सकाळी ११ वाजता कामोठे पोलीस ठाण्याच्या आवारात होणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी दिली. यामध्ये प्रामुख्याने टीव्हीएस स्कुटी, यामहा, स्प्लेंडर, बजाज डिस्ककव्हर, बजाज एक्स सीडी, बजाज कॅलिबर, बजाज पल्सर व बजाज अशा एकूण १० वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. तरी या संदर्भात लिलावात परवाना धारकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांनी केले आहे.

निवडक

## दुचाकीला कारची धडक

**रोहा :** नागोठणे रोहा रस्त्यावर दुचाकी (एमएच-०६-बीझेड-४८५१) चालक रोहा ते नागोठणे असे जात असताना चारचाकी (एच-४६-एएल-४७३९) चालक समोरून येणाऱ्या डंपरला ओव्हरटक करत असताना दुचाकीला जोरात धडकला. या अपघातात लहान मोठ्या दुखापती तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. याबाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार अविनाश पाटील हे करीत आहेत.

## मिनीडोअर-दुचाकी अपघात

**महाड :** आमशेत गावाजवळ मिनीडोअर (एमएच-०६-एस-४२०२) चालक मांघरूण येथून प्रवासी घेऊन बिरवाडीकडे येत असताना समोरून विरूद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीचालकाने मिनीडोअरला धडक दिली. या अपघातात दुचाकीचालक व त्याच्या पाठीमागे बसलेली आई हे दोघेजण जखमी झाले. याबाबत महाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पालीस हवलदार निलिमा गायकवाड हे करीत आहेत.

## जनजागृती शिबीर

**पाली :** मुस्लिम सोसायटी डेव्हलपमेंट गृप पाली-सुधागड यांच्या तर्फे रविवारी (दि.९) दुपारी साडेतीन वाजता पालीतील लिमये हॉल येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी विविध कायद्यांची माहिती आणि त्याचे मार्गदर्शन तज्ञ वकीलांद्वारे देण्यात आले. या शिबिरात प्राथमिक फौजदारी, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण, महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण, ग्राहक संरक्षण, माहितीचा अधिकार तसेच मोटार वाहन अधिनियमाबद्दल माहिती देण्यात आली.

## रस्त्याची केली दुरुस्ती

**तळा :** तळा शहराच्या प्रवेशद्वारावर रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेची अखेर नगरपंचायतीकडून डागडुजी करण्यात आल्याने वाहनचालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तळा शहराच्या प्रवेशद्वारावर माझी वसुंधरा अभियान अंतर्गत झाडे लावून सुशोभीकरण करण्यात आले आहे. या झाडांना पाणी पुरवठा करण्यासाठी रस्ता खोदून पाईपलाईन टाकण्यात आली होती. मात्र, पाईपलाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली नसल्याने दिवसेंदिवस हा रस्ता उखडून त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती.

## उरणमध्ये विजेचा खेळखंडोबा

**उरण :** महावितरण कंपनीकडून विद्युत वाहक तारांची व खांबांची देखभाल दुरुस्ती होत नसल्याने विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या घटनेत वाढ झाली आहे. याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. ग्रामपंचायत हद्दीतील गावे तसेच छोटे मोठे व्यवसायिक यांना महावितरण कंपनीच्या माध्यमातून विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. महावितरण कंपनीच्या अभियंत्यांनी जीर्ण झालेल्या विद्युत वाहक तारा व खांबांची दुरूस्तीची कामे तातडीने हाती घ्यावी, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

# खोपोली पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

### चोरीला गेलेले ५० मोबाईल हस्तगत; रायगड जिल्हा पो. अधिक्षक सोमनाथ घार्गेंनी केले कौतुक




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लोकांचे मोबाईल बाजारात तसेच यात्रेत गहाळ झाले होते. मोबाईल चोरीली गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर खोपोली पोलिसांनी तांत्रिक सर्वकष वापरत महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून ८ लाख ५० हजार रूपये किमंतीचे ५० मोबाईल हस्तगत केले आहेत. तसेच, संबंधित चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. बुधवारी (दि.१२) तक्रारदारांना पोलिस ठाण्यात बोलावून मोबाईल परत करण्यात आले आहेत. तर, खोपोली पोलिसांनी केलेल्या धडाकेबाज कारवाईचे रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी कौतुक केले आहे.

मोबाईल चोरी संदर्भात खोपोली पोलिस ठाण्यात रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. याप्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम, खोपोली पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरिक्षक शीतल राऊत, सहाय्यक पोलिस निरीक्षक अभिजीत व्हारंबळे, पो.ना.सागर शेवते, प्रदिप कुंभार, सतीश बांगर, प्रदीप खरात, देवकाते, राठोड आदि उपस्थित होते. यावेळी मोबाइल गहाळ किंवा चोरी झालेले मोबाईल तक्रारदारांना देण्यात आले.

सर्वसाधारणपणे मोबाईल फोन ही प्रत्येक नागरीकाच्या जिव्हाळयाची बाब असून मोबाईल फोन हे गरजेचे उपकरण झालेले आहे. तथापी बऱ्याचवेळा आपल्याकडून मोबाईल फोन कोठेतरी विसरणे, पडून गहाळ होणे अशा बाबी होत असतात. याबाबत खोपोली पोलीस ठाण्याकडे २०२३ ते २०२४ या कालावधीमध्ये गहाळ झालेल्या मोबाईल फोनच्या दाखल झालेल्या तक्रारींचा पुन्हा नव्याने आढावा घेण्यात आला व एक सर्वकष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये गहाळ झालेले मोबाईल पुन्हा ट्रेस करण्यात आले आणि पोलीस ठाण्याकडे दाखल असलेल्या तक्रारींमधील गहाळ झालेले ५० मोबाईल महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणांहून परत मिळविण्यात खोपोली पोलीसांना यश प्राप्त झाले.

वरीष्ठ पोलिस निरिक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलिस निरिक्षक अभिजीत व्हायरंबळे आणि अमोल राठोड यांनी धडाकेबाज कारवाई करीत ८ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ५० मोबाईल मिळविल्याबद्दल रायगड जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी कौतुक केले आहे.

## श्रीवर्धन शहर ठरले अव्वल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

जगातील सर्व प्रथम नामक 'डिजिटल वॉटर बँक' सुरु करण्यात आलेल्या संस्थेमार्फत श्रीवर्धन शहराची या घटकांकरिता गुणवत्ता तपासणी करण्यात आली होती. या सर्व्हेमध्ये श्रीवर्धन नगर परिषदेस ६२.५१ इतकी गुणसंख्या प्राप्त झाली असून श्रीवर्धन नगर परिषद ही मानांकन प्राप्त करणारी महाराष्ट्रातील प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे. जल या अति महत्वाच्या घटकाच्या गुणवत्तेची पारदर्शकता राखण्यासाठी त्याचे लेखापरीक्षण आणि पाण्याचे शाश्वत गुणांकन होणे आवश्यक आहे, ज्यातून श्रीवर्धन शहरातील पाण्याचा सुयोग्य वापर, पाण्याचे स्त्रोत आणि त्यांची क्षमता, पाण्याचा आवश्यक पुरवठा होत आहे की नाही आदिंची तपासणी या संस्थेमार्फत करण्यात आली होती. मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या पुढाकाराने श्रीवर्धन शहराचे शाश्वत जल परीक्षण करणे शक्य झाले आहे.

## अश्वपालक संघटनेचे घोडे बंद आंदोलन मागे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



माथेरान शहरात ई-रिक्षा स्थानिक हात रिक्षा चालक यांच्याकडून चालविण्यात येत आहेत. सोमवार दि.१० जून पासून या ई-रिक्षा चालविल्या जात असताना माथेरान शहरात प्रवासी सेवा देत असताना काही तक्रारी अश्वपालकांना जाणवल्या आहेत. त्या तक्रारींवर माथेरान नगरपरिषदेने खुलासा करावा या मागणीसाठी माथेरानमधील अश्वपालक यांनी आपले घोडे बंद ठेवले होते. मात्र, माथेरान पालिकेने त्या बाबत ई-रिक्षा चालकांना आपली भूमिका मांडण्यासाठी बोलावले आहे. तसे अश्वपालक यांना कळविण्यात आले असल्याने ई-रिक्षा चालकांची चौकशी पूर्ण होईपर्यंत घोडे बंद आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

माथेरानमध्ये ११ जून रोजी काही ई-रिक्षा चालकांनी नियम मोडून प्रवासी वाहतूक केली होती. त्यामुळे १२ जुन रोजी माथेरान मधील स्थानिक अश्वपाल संघटना आणि मुलवासी अश्वपाल संघटना यांनी माथेरान नगरपरिषदेकडे तक्रार करून कारवाई करण्याची मागणी केली होती. तसेच, नियम डावलून ई-रिक्षा चालविल्या जात असल्याने अश्वपालक यांनी आपले घोडे बंद ठेवले होते. मात्र, नगरपरिषदेचे प्रशासक राहुल इंगळे यांनी हस्तक्षेप करून स्थानिक अश्वपाल संघटना यांच्या तक्रारी अर्जावर पत्र व्यवहार केला. त्यात तुमच्या सर्व मागण्या आणि तक्रारी यांच्यावर ई-रिक्षा चालकांची श्रमिक रिक्षा संघटना यांना खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत.

# माथेरानमध्ये ताडपत्रीची खरेदी तेजीत

**। माथेरान । वार्ताहर ।**



पावसापासून घरांची गळती तसेच घोड्यांच्या तबेल्यांची व अन्न धान्यांच्या सुरक्षेसाठी ताडपत्री हे महत्वाचे साधन आहे. पावसाळा सुरु झाली की माथेरान बाजारपेठेत ताडपत्री खरेदी तेजीत असते. या करिता माथेरानमध्ये पावसाळापूर्व लागणारी ताडपत्री बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाली असून या ताडपत्री खरेदीचा बाजार चांगलाच तेजीत आला आहे.

माथेरानच्या डोंगराळ भागात पावसाचे प्रमाण सर्वाधिक असल्याने मान्सून दारात येऊन ठेपला आहे. काही दिवसातच जोरदार पाऊस बरसण्यास सुरवात होणार आहे. याकरिता येथील नागरिक, हॉटेल व्यावसायिक, अश्वपालक हे आपल्या घरांसाठी, घोड्यांच्या तबेल्यासाठी तसेच घोड्यांचे खाद्य गवत, भुसा, कुट्टी हे सर्व पावसाळ्यापूर्वी व्यवस्थितपणे प्लास्टिक बंद करून व झाकून ठेवण्यासाठी ताडपत्री खरेदीसाठी गर्दी करताना दिसत आहेत. तर, स्थानिक दुकानदार सुद्धा पावसाळ्यापूर्वी वाहणाऱ्या जोराच्या वाऱ्याने दुकानावरील छप्पर, पत्रे उडून नुकसान होऊ नये यासाठी अगोदरच ताडपत्री टाकून आणि ते व्यवस्थित बांधून ठेवत आहेत.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा प्लास्टिक ताडपत्रीच्या दरात वाढ झाली आहे. जाड ताडपत्री मागील वर्षी १०० रु. मीटर प्रमाणे मिळत होती. यंदा मात्र याचा दर १२० रु. मीटर झाला आहे. आणि यापेक्षा कमी दर्जाचे प्लास्टिक ८० रु ते १०० रु. मीटरप्रमाणे विक्री होत आहे.

> **आमच्या घोड्यांच्या तबेल्यात पावसाचे पाणी जाऊ नये यासाठी ताडपत्रीचा वापर करण्यात येतो. त्यांना पावसाळ्यात लागणारा अन्नसाठा देखील आम्ही सर्व अश्वपालक जमा करून ठेवत असतो आणि तो अन्नसाठा येथे कधी अतिवृष्टीमुळे खराब होऊ नये, वाया जाऊ नये यासाठी काळजीपूर्वक येथे ताडपत्रीचा वापर करून बांधून ठेवला जातो.**
> **–जयराज बर्गे, अश्वचालक, माथेरान**

## उष्म्यामुळे नागरिक हैराण

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यात सोमवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली होती. रात्री सुद्धा एक-दोन सरी बरसल्या. त्याचप्रमाणे मंगळवारी पहाटे मुसळधार पाऊस पडला होता. यानंतर मंगळवार, बुधवार, गुरुवार तीन दिवस कडक ऊन पडत असल्यामुळे हवामानामध्ये प्रचंड उष्मा निर्माण झाला आहे. पाऊस पडून गेलेला असल्यामुळे वातावरणातील सापेक्ष आर्द्रता खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे नागरिकांना उष्म्या सोबतच प्रचंड घाम येण्याचा अनुभव देखील सहन करावा लागत आहे.

## नरेश गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश

**। पाली । वार्ताहर ।**



खुरावले फाटा ते वाघोशी या रस्त्याच्या झालेल्या दयनीय अवस्थेबाबत ऑल इंडिया पँथर संघटनेचे नरेश गायकवाड यांनी केलेल्या पाठपुरवठ्याला अखेर यश आले आहे. उशिरा का होईना ठेकेदाराला शहाणपण सुचले असून खड्डे पडलेल्या ठिकाणी डांबर कार्पेट मारण्यात आले आहे.

खुरावले फाटा ते वाघोशी या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत केलेल्या रस्त्याची पहिल्याच वर्षी दुरावस्था झाली होती. अतिशय निकृष्ठ दर्जाचे काम, ठेकेदाराकडून कामात दिरंगाई, प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळेच हा रस्ता एक वर्ष सुध्दा नीट काढू शकला नाही. स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी व पत्रकार यांनी रस्त्याच्या निकृष्ठ कामाबाबत वारंवार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. परंतु, याकडे प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष केले.

वर्षभरापूर्वी रस्त्याच्या काही ठिकाणी ठेकेदाराकडून खड्डे भरण्यात आले होते. मोठ्या प्रमाणावर खराब झालेल्या ठिकाणी कार्पेट मारून देण्याचे आश्वासन ठेकेदाराकडून देण्यात आले होते. परंतु, त्यांच्या वचनपूर्तीला एक वर्ष लोटले. हे काम पावसाळ्याआधी व जलदगतीने व्हावे यासाठी नरेश गायकवाड हे सतत प्रयत्नशील राहिले. मात्र, ठेकेदार व प्रशासनाकडून वेळकाढूपणा करण्यात आला. अखेर नरेश गायकवाड यांच्या माध्यमातून प्रशासनाला आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला. याचीच दखल घेत ठेकेदाराकडून गुरूवारी (दि.१३) कार्पेट टाकण्यास सुरुवात करण्यात आली.

## पालिकेच्या परवानगीशिवाय फलक उभारण्याचे काम

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**



घाटकोपर येथील जाहिरात फलक कोसळून दुर्घटना घडल्याची घटना ताजी असतानाच पनवेल पालिका हद्दीत अवाढव्य जाहिरात फलक उभरण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. महत्वाचे म्हणजे रेल्वेच्या परवानगीने सुरु असलेल्या या कामासाठी पनवेल पालिकेच्या परवानगीची गरज नसल्याची माहिती जाहिरात फलक उभरणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी दिली असून, पालिकेच्या परवाना विभागाचे अधिकारी जयराम पादीर यांनी देखील याला दुजोरा दिला आहे. प्रशासनाच्या निर्देशनुसार पनवेल पालिका हद्दीत देखील स्ट्रकचरल ऑडिट सादर न करू शकलेल्या जाहिरात फालकांवर तोडक कारवाई करण्यात आली. तसेच, उर्वरित जाहिरात फलक लावणाऱ्या कंपन्यांना योग्य कागदपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. एकीकडे पालिका प्रशासनाकडून अवाढव्य फलकावर कारवाई सुरु असतानाच पालिकेच्या परवानगी शिवाय रेल्वेच्या मंजुरीने जाहिरात फलक उभरण्याचे काम सुरु करण्यात आल्याने रेल्वेला घाटकोपर दुर्घनेशी कोणतेही देणे घेणे नसल्याचे उघड होत आहे.



● मुरुड परिसरात पावसाळा सुरु झाल्याने पर्यटकांची संख्या कमी झाली. परंतु, सायंकाळच्या वेळी किनाऱ्यावर तुरळक पर्यटक घोडागाडीचा आनंद घेताना दिसत आहेत. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## प्रलंबित प्रश्नाविषयी संचालकांची भेट



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती शिक्षक संघटनेने राज्यातील प्रलंबित प्रश्नाविषयी शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य पुणे यांची मध्यवर्ती शिक्षक संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली भेट घेऊन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी केंद्रप्रमुख भरती बाबत या विषयासंदर्भात वारंवार निवेदन देऊन राज्यातील काही जिल्हा परिषदांमध्ये चुकीच्या पद्धतीने कार्यवाही होत असल्याने अनेक शिक्षक संघटनाचा न्यायालयात व शासन दरबारी पत्रव्यवहार सुरू होता. याबाबत सर्व जिल्हा परिषदेंना प्रशिक्षित पदवीधर सेवा जेष्ठता ग्राह्य धरून केंद्रप्रमुख पदे तातडीने भरण्यातसाठी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार शासन सेवेत दि.१ नोव्हेंबर २००५ पूर्वी व त्यानंतर रुजू झालेल्या राज्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना केंद्र सरकारच्या धर्तीवर जुनी निवृत्ती पेन्शन योजना लागू करण्यासंदर्भात चर्चा करून निवेदन देण्यात आले.

शासनाने दिलेल्या पैशांमध्ये विद्यार्थी गणवेश शिलाई होत नाही. त्यामुळे शासनाने आम्हाला पूर्ण तयार असणारे गणवेश पुरवावेत, अशी मागणी करण्यात आली. जिल्हा परिषद कार्यरत असणाऱ्या शिक्षकांमध्ये विज्ञान व गणित विषयाचे पदवी धारक असल्याने पवित्र पोर्टल भरतीपूर्वी उपशिक्षकांना विषय शिक्षकांचे पदोन्नती देऊन ती पदे शिक्षकातून भरण्यात यावे यासंदर्भात चर्चा केली. यावर्षी राज्यातील शिक्षकांना दिवाळीची अगाऊ रक्कम मिळाली नाही त्या संदर्भात शिक्षण संचालकांशी चर्चा करून निवेदन दिले. संच मान्यता जुन्या पद्धतीनेच करण्यात यावी, नवीन संच मान्यता लागू करू नये. केंद्रप्रमुख व पदोन्नती मुख्याध्यापक यांना पदोन्नती मिळाल्यापासून पुर्वलक्षी प्रमाणे वेतन वाढ लागू करणे या संदर्भात शासनास अहवाल सादर करणे, अशा विविध विषयांवर निवेदन देऊन चर्चा करण्यात आली.

यावेळी राज्याध्यक्ष तथा मध्यवर्ती शिक्षक संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे, पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल पलांडे, पदवीधर शिक्षक संघटनेचे सरचिटणीस मनोज मराठे, अलिबाग पतपेढी संचालक प्रफुल्ल पवार आदि पदाधिकारी उपस्थित होते.

## नागोठण्यात तांत्रिक शिक्षणाची सोय

**नागोठणे :** नागोठण्यात नव्यानेच स्थापन झालेल्या राजा मिलिंद एज्युकेशन सोसायटीद्वारा संचलित, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्किल डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटमध्ये डिप्लोमा इन इलेक्ट्रिशन कोर्स हा दोन वर्षाचा कोर्स आणि सीसी वायरमेन हा एक वर्षाचा कोर्स सुरु करण्यात आल्याची माहिती इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष नवनाथ डोंगरगावकर यांनी दिली. हा कोर्स शासन मान्य असून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आहे. या कोर्सला मुला-मुलींना प्रवेश घेता येणार आहे. प्रवेशासाठी मो.क्र. ९०४९८८२०३६ यावर संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे.

### संगणकीय ॲप पद्धतीचा मोठा फायदा

# एसटी महामंडळातील बदल्या होणार पारदर्शक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एसटी महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी या नव्या पध्दतीने शक्य होणार आहे.

एसटी महामंडळामध्ये चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सुमारे ८७ हजार कर्मचारी सध्या कार्यरत आहे. एक मध्यवर्ती कार्यालय, सहा प्रदेश, त्या प्रदेशांतर्गत ३१ विभाग आणि या विभागांतर्गत कार्यरत असलेले २५१ आगार. या बरोबरच तीन मध्यवर्ती कार्यशाळा, ९ टायर पुनस्त:रण प्रकल्प आणि एक मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था असा एसटी महामंडळाचा अवाढव्य पसारा आहे. या सर्व आस्थापनांमध्ये काम करणारे कर्मचारी गंभीर आजारपण, पती-पत्नी एकत्रीकरण, आपापसातील बदली अशा अनेक कारणास्तव विनंती बदलीचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांकडे सादर करत असतात. परंतु विविध प्रकारच्या हस्तक्षेपामुळे, बदल्यांमध्ये अनियमितता होत असते. परिणामी, कर्मचाऱ्यांना योग्य प्रकारे न्याय मिळत नाही. अनेक कर्मचाऱ्यांचे विनंती बदली अर्ज वर्षानुवर्ष धुळखात पडलेले असतात. याला आळा घालण्यासाठी आणि सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळण्याच्या हेतूने महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्या विशेष पुढाकाराने बदल्या संदर्भातील संगणकीय प्रणालीद्वारे ॲप एसटी महामंडळाकडून विकसीत करण्यात येत आहे.



> **संबंधित कर्मचाऱ्याला विनंती बदलीमध्ये तीन पर्याय देण्याची मुभा देण्यात आलेली आहे. बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी भविष्यात संगणकीय ॲप पद्धतीचा मोठा फायदा होणार असून विविध जात प्रवर्ग, बिंदु नामावली विचारात घेऊन रिक्त पदाच्या ठिकाणी सेवा जेष्ठतेनुसार बदल्या करण्याची संगणकीय पत महामंडळाने स्विकारली आहे. कर्मचाऱ्यांना समान न्याय देण्याबरोबरच महामंडळाच्या मनुष्यबळाचा क्षेत्रनिहाय समसमान वापर करण्यासाठी देखील हे ॲप उपयुक्त ठरणार आहे. लवकरच या संगणकीय ॲपव्दारे बदलीची प्रक्रीया सुरू करण्यात येणार आहे.**
> **–अभिजीत भोसले, जनसंपर्क अधिकारी, एसटी महामंडळ**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# पुन्हा मराठा आंदोलन

निवडणुका झाल्या-झाल्या पुन्हा एकवार मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा पुढचा अंक सुरू झाला आहे. यंदाच्या निवडणुकांमध्ये मराठा समाजाची मते विरोधात गेल्याचा भाजपला जोरदार दणका बसला आहे. विशेषतः मराठवडा, सोलापूर व काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्र तसेच विदर्भात हा असर जाणवला. खुद्द जरांगे यांच्या जालना जिल्ह्यात रावसाहेब दानवे हे भाजपचे हुकमी उमेदवार होते. त्यांचा धक्कादायक पराभव झाला. नांदेड, परभणी व हिंगोलीतील विजयातही मराठा मतांचा मोठा वाटा होता. किंबहुना, मराठा आंदोलनामुळे मराठा विरुध्द ओबीसी असे तट पडल्याचेही अनेक ठिकाणी दिसले. या स्थितीत जरांगे यांच्या उपोषणाकडे दुर्लक्ष करणे सरकारला परवडणारे नाही. गंमत म्हणजे जरांगे एकीकडे एकनाथ शिंदे यांच्यावर आमचा पूर्ण भरवसा आहे असेही सांगत आहेत, तर दुसरीकडे विधानसभेच्या जागा लढवण्याचा इशारा देत आहेत. भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांचा विशेष राग आहे. फडणवीस यांच्या पोलिसांनीच आपल्या कार्यकर्त्यांवर पहिला लाठीहल्ला केला व त्यांच्यावरचे गुन्हे अजूनही मागे घेतले गेलेले नाहीत याविषयी जरांगे शिव्याशाप देत असतात. मध्यंतरी फडणवीस यांनी जरांगे यांचीच एसआयटी लावण्यात येईल असे जाहीर केले होते. लाठीहल्ल्याच्या आधी पोलिसांवर ठरवून हल्ला केला गेला होता, असे पुरावे सापडल्याचे सरकारने म्हटले होते. शरद पवार व अन्य विरोधी नेत्यांनी जरांगे यांच्या भेटी घेतल्यानंतर हा कट शिजल्याचे त्यावेळी सूचित करण्यात आले होते. असल्या आरोपांची गंमत अशी असते की ते तेवढ्यापुरते करायचे असतात व विसरून जायचे असतात. त्यावेळपुरते जरांगेंना बदनाम केले व त्यांच्यावर बाजू उलटवली की झाले असे फडणवीस यांच्यासारख्या नेत्यांना वाटत असते. फडणवीस हे सत्तेत आहेत व गृह खाते त्यांच्याकडे आहे. त्यामुळे त्यांना सोईस्कर असेल त्यानुसार हे आरोप कधीतरी बाहेर काढले जातात व ते गैरसोईचे असेल तेव्हा कपाटात बंद करून ठेवण्यात येतात.

### शिंदे गटाचा धोका

अर्थात, ज्या भाजपची प्रसिध्दी वॉशिंग मशीन अशी झाली आहे त्याच्याकडून अशी लबाडी ही धक्कादायक नाही. असो. तूर्तास जरांगे यांना चुचकारण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण त्यांना रोखणे शक्य होत नाही असे वाटले तर या आरोपांचे पुनरुज्जीवन होईल. अर्थात, लोकसभेच्या निवडणुकीत जरांगेंनी आपली उपद्रवक्षमता दाखवून दिली आहे. ते जिंकून आणू शकत नसले तरी उमेदवार पाडू शकतात हे दिसले आहे. त्यातच फोडाफोडीमुळे यंदा लोकसभेला सर्वांचीच गणित चुकली. दहा ते बारा लाखांच्या मतदारसंघातही शेवटच्या क्षणापर्यंत कोण निवडून येईल हे सांगणे अशक्य झाले. विधानसभेला तर ही चुरस प्रचंड वाढणार आहे. लोकसभेला मोदी विजयी होणे हे भाजपची गरज होती. त्यामुळे शिंदे व अजितदादा गटाला काही प्रमाणात झुकते माप देण्यात आले. पण त्यात शिंदे गट शिरजोर होऊन बसला. त्याला जवळपास भाजपइतक्याच जागा मिळाल्या. एनडीएमध्ये तो तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला आणि एकनाथ शिंदे थेट नरेंद्र मोदी यांच्या बरोबरीने बसून त्यांच्याशी वाटाघाटी करू शकतील अशी स्थिती निर्माण झाली. त्यामुळे विधानसभेला शिंदे गटाची नाकेबंदी करण्याचे सर्व ते प्रयत्न भाजप यावेळी करणार. सध्या जरांगे हे शिंदे यांच्याविषयी अनुकूल बोलत आहेत. त्याचा फायदा शिंदे गटाला होऊ शकतो. तो होऊ नये यासाठी भाजपला नवी तरकीब शोधून काढावी लागेल. मात्र त्याचवेळी आपल्या हक्काचा ओबीसी मतदार दुरावणार नाही हेही पाहावे लागेल. मराठवाडा, विदर्भ, नाशिक तसेच सोलापूर भागात अनेक मतदारसंघांमध्ये जरांगे यांच्या आंदोलनामुळे मराठा समाज एकतर्फी मतदान करू शकतो. विधानसभेला थेट फडणवीसांना धडा शिकवण्याचे आवाहन परिणामकारक ठरू शकते. याच भीतीमुळे भाजपचे आमदार व नेते जरांगेंना भेटू लागले आहेत. फडणवीस यांनीही तात्काळ जरांगेंना वाटाघाटींसाठी येण्याची विनंती केली आहे.

### चर्चेला जागा ठेवा

दरम्यान, जरांगे यांनी सतत उपोषणाच्या धमक्या देऊन आपल्या मनाप्रमाणे मागण्या मंजूर करून घेणे हे कितपत योग्य आहे याचा विचार व्हायची आता वेळ आली आहे. गेल्या वेळी मुंबईत उपोषणाला येणार अशी धमकी देऊन ते नवी मुंबईतून परत गेले. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी जी अधिसूचना काढली त्यामुळे आपल्या सर्व मागण्या मान्य झाल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यानंतर राज्यात ठिकठिकाणी जल्लोष झाला. शिंदे यांनी जरांगेंचे उपोषण यशस्वीपणे संपवल्याचे सर्व श्रेय आपल्याकडे घेतले. पण नंतर दोनच दिवसात जरांगे यांची भूमिका बदलली. सगेसोयरेचा मुद्दा त्यांनी पुन्हा उपस्थित केला. केवळ बाप, मुलगा, काका, पुतण्या अशा रीतीने एकाचा दुसऱ्याला मराठा असल्याचा फायदा न मिळता, लग्न झाल्यानंत बायकोकडच्या नातेवाईकांना वा त्यांच्याकडून इकडे असाही लाभ मिळावा असे जरांगेंचे म्हणणे आहे. ते कायद्यात बसणारे नाही. कारण, आपल्याकडे आरक्षण हे पितृसत्ताक पद्धतीनुसार ग्राह्य धरले जाते. त्यात असा मराठ्यांसाठी बदल करणे शक्य होणारे नाही. जरांगे यांची मागणी तात्विकदृष्ट्या योग्य वाटली तरी ती उपलब्ध कायद्यात बसवता येणारी नाही. शिंदे यांनी मराठ्यांना जातिनिहाय सर्वेक्षणाच्या आधारे दहा टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली होती. पण मुळात हे सर्वेक्षण ज्या घाईघाईने केले गेले ते सर्वच संशयास्पद होते. ते न्यायालयात टिकणार का हा प्रश्न आहे. शिवाय, इतके करूनही मराठ्यांना स्वतंत्र नव्हे तर ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण मिळावे ही जरांगे यांची मागणी कायम आहे. ती मान्य होणे कठीण आहे. एकूण आरक्षणाचे प्रमाण पन्नास टक्क्यांवर जाणे हेदेखील योग्य नाही. न्यायालयात या सर्व मुद्द्यांना धरून अपील झालेले आहे व तेथे आपण म्हणतो तेच खरे हा जरांगे यांचा हेका चालू शकणार नाही. जरांगे यांच्या आंदोलनाने ओबीसीमधील अस्वस्थता वाढली आहे. तुर्तास सरकारला त्यांनी एक महिना मुदत दिली हे चांगलेच आहे. आता हा प्रश्न चर्चेने सुटायला हवा.

## विचार

# विकासवाटेला हवे दूरदृष्टीचे भान

***आजघडीला सरकारी गुंतवणूक अर्थव्यवस्थेला भक्कम आधार देत आहे तर खासगी उपभोग खर्चामध्ये सातत्य कायम असून चार टक्क्यांवर रेंगाळला आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मागील वर्षात तुलनेत कमकुवत स्थितीत आहे. त्यामुळे नवीन सरकारला ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. नव्या सरकारने शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राशी निगडित सुधारणा वेगाने अंमलात आणायला हव्यात.***



**हेमंत देसाई**

जगातील अनेक प्रमुख जागतिक अर्थव्यवस्था तीव्र व्याजदरांमुळे मंदावल्या असताना भारताच्या अर्थव्यवस्थेने जोरदार वाढ दाखवली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ)च्या मतानुसार २०२४ मध्ये अमेरिकेची अर्थव्यवस्था २.७ टक्क्यांनी वाढेल तर युरोझोन आणि चीनमध्ये अनुक्रमे ०.८ टक्के आणि पाच टक्के वाढ अपेक्षित आहे. या जागतिक मंदीच्या काळात भारताच्या जीडीपीमधील निर्यातीचा वाटा २०२२-२३ मधील २३.९ टक्क्यांवरून २०२४ मध्ये २२.७ टक्क्यांवर घसरला. तथापि, ढोबळ स्थिर भांडवलनिर्मिती हा प्रमुख गुंतवणूक निर्देशक वार्षिक अंदाजे नऊ टक्क्यांनी वाढला आहे. लोकसभा निवडणुकांचे सत्र संपले असून नवीन सरकारवर अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारण्याची जबाबदारी आहे. मात्र स्थिती वाटते तेवढी अवघड नाही. याचे कारण, भारताची वित्तीय तूट २०२३-२०२४ मध्ये १६ लक्ष ५४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली असून १७ लक्ष ८६ हजार कोटी रुपये राहील, असा अंदाज होता. म्हणजेच वर्षभरात जेवढी तूट येईल असा अंदाज होता, त्यापेक्षा ती सुमारे पाच टक्के कमीच आहे. देशाच्या महालेखापालांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सरलेल्या आर्थिक वर्षात केंद्र सरकारची वित्तीय तूट जीडीपी किंवा सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ५.६ टक्के आहे. सुधारित ५.८ टक्क्यांच्या अंदाजापेक्षा ती कमीच आहे. याचा अर्थ केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आर्थिक शिस्त पाळून कारभार केला आहे.

सुदैवाने गेल्या आर्थिक वर्षात करमहसुलापोटी सरकारला समोर ठेवलेल्या उद्दिष्टाएवढेच म्हणजे २३ लाख कोटी रुपये मिळाले. त्या तुलनेत सरकारचा एकूण खर्च ४४ लाख कोटी रुपये आहे. तो मूळ लक्ष्याच्या ९९ टक्के इतका आहे. सामान्यतः कोणत्याही पक्षाचे सरकार असो, उत्पन्न किंवा खर्चाची लक्ष्ये पूर्ण केली जात नाहीत. मुळात सरकारने करसंकलनाचे काम कार्यक्षमतेने करून जास्त महसूल मिळवला आहे. अनुदानांवरील खर्चाला कात्री लावल्यामुळे तुटीचे लक्ष्य जवळपास साध्य करणे शक्य झाले आहे. त्याच वेळी राष्ट्रीयीकृत बँकांनी थकित कर्जापोटी दहा लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसूल केली आहे. यामुळे सरकारची तिजोरी भरभक्कम होणार आहे. ईडी किंवा अंमलबजावणी खात्याने १,१०५ बँक फसवणूक प्रकरणांची चौकशी केली आणि ती पूर्ण होऊन या गुन्ह्यांमधील ६४ हजार कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. त्याचा परिणाम असा झाला की गेल्या वर्षअखेरपर्यंत १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता राष्ट्रीयीकृत बँकांकडे वळती करण्यात आली. भरीस भर म्हणून की काय, देशातील बँकिंग क्षेत्राचा एकत्रित निव्वळ नफा २०२३-२४ मध्ये प्रथमच ३० लाख कोटी रुपयांच्या पार गेला. अर्थात नेहमीप्रमाणे सरकारी बँकांपेक्षा खाजगी बँकांचा कारभार अधिक चांगला ठरला. म्हणूनच सरकारी बँकांचा निव्वळ नफा एक लक्ष ४१ हजार कोटी रुपयांचा आहे तर खाजगी बँकांचा एकत्रित निव्वळ नफा एक लाख ७८ हजार कोटी रुपये इतका आहे. अर्थात सरकारी बँकांवर केंद्र सरकार टाकते तशा जबाबदाऱ्या खाजगी बँकांवर नसतात हे लक्षात घेतले पाहिजे.

आणखी एक सुवार्ता म्हणजे, भारताने ब्रिटनमध्ये ठेवलेले १०० टन सोने संपलेल्या आर्थिक वर्षात भारताच्या तिजोरीत हलवण्यात आले आहे. १९९१ मध्ये भारताची परकीय चलनाची गंगाजळी आटली होती. याचे कारण त्या अगोदर व्ही. पी. सिंग सरकार कोसळले होते. देशात मंदिर-मंडल वाद सुरू झाला होता. त्यानंतर चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालील सरकार अस्तित्वात आले. ते अत्यंत कमजोर होते. दुसरीकडे आखाती युद्धही सुरू झाले होते. इंधनाचे भाव भडकले होते. देशाला आवश्यक वस्तू व यंत्रसामग्री आणि कच्चे तेल वगैरे आयात करण्यासाठी लागणारे डॉलरदेखील आपल्याकडे नव्हते. भारताच्या डोक्यावर प्रचंड कर्ज होते. अशा वेळी सोने गहाण ठेवून कर्जउभारणी करणे भाग पडले होते. त्यानंतर पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालील सरकार आले आणि डॉ. मनमोहन सिंग हे अर्थमंत्री बनले. देशाची आर्थिक दुर्दशा लक्षात येताच त्यांनी उदारीकरणाचा रस्ता निवडला.

अनेक कठोर आर्थिक निर्णय घेतले आणि देशाला सुरळीत मार्गावर आणून ठेवले. त्यानंतर कर्जाची परतफेड केल्यानंतरही सोने ब्रिटनमध्येच होते. आता मात्र हे सोने पुन्हा भारतात आल्यामुळे, रिझर्व बँकेकडील सोन्याचा साठा प्रचंड वाढला आहे. मौल्यवान धातू असलेल्या सोन्याचा बराचसा भाग परदेशात साठवला जातो. म्हणूनच इतर देशांप्रमाणेच भारताचे सोनेही बँक ऑफ इंग्लंडकडे होते. आता देशात रिझर्व बँकेकडे ४०८ टन सोने असून परदेशात ४१४ टन सोने आहे. जारी केलेल्या रोख्यांसाठी तरतूद करावी लागते, म्हणून काही प्रमाणात सुवर्णसाठा आपल्याकडे ठेवावाच लागतो.

एप्रिल २०२३ मध्ये कोळसा, तेल, नैसर्गिक वायू, ऊर्जा, इंधन शुद्धीकरण उत्पादने, पोलाद, सिमेंट आणि खते या पायाभूत क्षेत्रांनी सरासरी ६.२ टक्के दराने वाढ नोंदवली आहे. याचा अर्थ इतर क्षेत्रांतून या उत्पादनांना चांगली मागणी आहे. अर्थव्यवस्था सुदृढ बनत असल्याचे हे लक्षण मानावे लागेल. मुळात जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे स्थान कायम राहिले आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशाच्या सकल उत्पादनाने म्हणजेच जीडीपी ८.२ टक्क्यांची वाढ नोंदवल्याची घोषणा नुकतीच केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने केली आहे. २०२२-२३ या संपूर्ण आर्थिक वर्षात हा दर सात टक्के होता. एक लक्षात घेतले पाहिजे की उत्पादन क्षेत्राच्या सरस कामगिरीमुळेच हे शक्य झाले आहे. खनिज उत्खनन तसेच बांधकामक्षेत्रातील वाढीने अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. मात्र कृषी क्षेत्रातील विकासाचा वेग मंदावला आहे. आजही देशातील बहुसंख्य लोक शेतीवर अवलंबून आहेत. अशा वेळी कृषी विकासाचा वेग अधिक असणे आवश्यक आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, महापूर, दुष्काळ या संकटांना वारंवार तोंड द्यावे लागत आहे आणि त्याचा फटका शेतीला बसत आहे, हे स्पष्ट आहे. परंतु त्याच वेळी शेतीमालाला वाजवी आधारभाव नसणे, शेतीच्या निर्यातीवर बंदी आणि निर्बंध तसेच अनावश्यक शेतीमालाची आयात करणे अशा अनेक चुकीच्या धोरणांचा फटकाही शेतकऱ्यांना बसल्याचे वारंवार दिसून आले आहे. जीडीपी वाढीसाठी दोन घटकांनी मागील वर्षात अपेक्षेपेक्षा जास्त महत्त्वाचे योगदान दिले आहे. एक म्हणजे २०२४ मध्ये दिसलेला घाऊक किंमत निर्देशांक अत्यंत कमी राहिल्याने जीडीपीच्या वाढीमधील वास्तविक आणि अंदाजित फरक कमी झाला आहे. ही चलनवाढ तीन टक्के किंवा त्यापेक्षा कमी झाल्यामुळे वास्तविक आणि नाममात्र जीडीपीतील फरक सरासरी पातळीवर परत आली आहे. दुसरे म्हणजे, कर संकलनातील चढ-उतार आणि अर्थसंकल्पीय सबसिडी पेआउट्सनेदेखील जीडीपी वाढवण्यात मदत केली आहे. सरकारी गुंतवणूक अर्थव्यवस्थेला भक्कम आधार देत आहे तर खासगी उपभोग खर्चामध्ये सापेक्ष कमकुवतपणा अजूनही कायम असून सध्या चार टक्क्यांवरच रेंगाळला आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्था मागील वर्षात तुलनेने कमकुवत स्थितीत असल्याचे दिसून आल्याने सरकारला आता गती द्यावी लागणार आहे. त्यामुळे सत्तेवर आलेल्या नवीन सरकारला ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गतीसाठी खूप मेहनत घ्यावी लागणार आहे. नव्या सरकारने शेतीला प्राधान्य दिल्यास अर्थव्यवस्थेचा वेग आणखी वाढण्यास मदत होईल. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र याच्याशी निगडित असलेल्या सुधारणा आगामी सरकार वेगाने अंमलात आणेल, अशी अपेक्षा आहे.

## आजकाल

# १४ जून जागतिक रक्तदाता दिनानिमित्त..

**हेमकांत सोनार**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना अनेक राष्ट्रीय कार्यक्रमांपैकी रक्तदान चळवळ समाजात रुजविण्यात महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, विविध सामाजिक संस्था आदींच्या माध्यमातून यशस्वी होत आहे. मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्याने रक्तदानाची प्रेरणा समाजात दृढ करणे, सुदृढ रक्तदात्यांची फौज उभी करणे, वाढदिवसाला किंवा तीन महिन्यांनी रक्तदान करणे, रक्तदानाची प्रेरणा रक्तदात्यांमध्ये दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी रक्तदान यज्ञात स्वैच्छिक रक्तदाता म्हणून सहभागी व्हावे. आपण समाजाचे जबाबदार घटक या नात्याने समाजात मोठ्या प्रमाणात रक्तदात्यांमध्ये स्वैच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती व्हावी हा या मागचा प्रमुख उद्देश आहे.




जागतिक आरोग्य संघटना, रेड क्रॉस आणि रेड क्रेसेंट सोसायटीज, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ब्लड डोनर ऑर्गनायझेशन्स आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन यांनी सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादनांच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि स्वैच्छिक रक्तदानाबद्दल रक्तदात्यांचे जीवन वाचविणाऱ्या उदात्त कृत्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी १४ जून जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. सन २००४ मध्ये आंतरराष्ट्रीय संघटनेव्दारे आयोजित करण्यात आला होता.

५८ व्या जागतिक आरोग्य संमेलनात सन २००५ मध्ये रक्तदानाच्या महत्त्वाविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी हा वार्षिक जागतिक कार्यक्रम म्हणून घोषित करण्यात आला.

**१४ जून जागतिक रक्तदाता दिनाचे महत्त्व :-**

ए,बी,ओ रक्तगटाचे जनक कार्ल लँडस्टेनर (ऑस्ट्रेलिया, व्हिएन्ना शहर) यांचा १४ जून १८६८ हा जन्मदिवस आहे. या संकल्पनेतून जागतिक रक्तदाता दिन साजरा करण्यात येतो. या संशोधनासाठी त्यांना सन १९३० मध्ये नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानवाचे प्राण वाचवण्यासाठी ज्या रक्तदात्यांनी आपले स्वैच्छिक रक्तदान करुन रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी रक्तदान केलेल्या रक्तदात्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दा दिवस आहे. रक्तदाता अनेक वर्षांपासून ज्या रक्तदात्यांनी सामाजिक बांधिलकी ठेवून आयोजित रक्तदान शिबिरात, स्वयंस्फूर्तीने जवळच्या शासन मान्यताप्राप्तरक्तकेंद्रातगरजूरुग्णांसाठीरक्तदान(२५,५०,१०० किंवा त्यापेक्षा जास्त वेळा) केलेल्या रक्तदात्यांप्रति आभार व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे १४ जून जागतिक रक्तदाता दिन होय.

**रक्तदात्यांचे अमुल्य रक्तदान:-**

थँलेसेमिया, हिमोफिलिया, प्रसूती, अपघात, रक्तक्षय, कर्करोग, अतिरक्तस्त्राव इ. रुग्णांसाठी रक्त हे लाईफ लाईन आहे. अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज असते. रुग्णांचा जीव वाचविण्यासाठी माझे रक्तदान अमूल्य आहे. बोन मॅरोमध्ये नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता वाढते. रक्तदान प्रक्रियेत रक्तदानाची सुरक्षितता काटेकोरपणे पाळली जाते. त्यामुळे कोणतीही इजा किंवा आजार होण्याची शक्यता नसते. मानवी रक्ताला पर्याय नाही कारण रक्त हे कृत्रिमरित्या प्रयोगशाळेत तसेच कारखान्यात तयार करता येत नाही, तसेच जास्त दिवस साठवूनही ठेवता येत नाही.

त्यामुळे माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त द्यावे लागते. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, दान केलेले रक्त नैसर्गिकरित्या भरून निघते. रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी रक्तदाता म्हणून आपले स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे आहे. आपल्या स्वैच्छिक रक्तदानाने एखाद्या रुग्णांचे प्राण वाचवू शकतो. यासाठी माझे स्वैच्छिक रक्तदान महत्त्वाचे आहे. रक्तदान प्रक्रिया सुरक्षित, आनंददायी तसेच नवचेतना निर्माण करणारी असते. समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून नि:स्वार्थपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवेच्या भावनेतून आपले रक्तदान महत्त्वाचे आहे. शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून रक्त घेतले जाते.

आपले रक्तदान रक्तदाता म्हणून अमुल्य असून आपल्या रक्तदानाने नक्कीच आपण रुग्णांचे प्राण वाचवू शकतात. रक्तदानाच्या या महान कार्यात आपण ''रक्तदाता'' म्हणून सहभागी होऊन भारतीय नागरिक म्हणून देशाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात मोलाचे योगदान देऊ शकता. रक्तदाते आणि रक्तदान शिबिर आयोजक यांचे रायगड जिल्ह्यात रक्तदान जनजागृतीपर फार महत्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मदत होत आहे. रक्तदान हे एकतेचे महान कार्य आहे. या प्रयत्नात सामील व्हा आणि जीव वाचवा.

## लोकसंसद

### पाच कंपन्या करतायेत एक चतुर्थांश प्लास्टिक प्रदूषण

सायन्स ॲडव्हान्स या नियतकालिकात प्लास्टिक प्रदूषणासंबंधी काही माहिती प्रसिद्ध झाली आहे. जगभरातील निम्म्यापेक्षा जास्त प्लास्टिक प्रदूषणाला ५६ बहुराष्ट्रीय कंपन्या जबाबदार आहेत. या नियतकालिकाने ८४ देशातील प्लस्टिकबरोबर संबंधित १८ लाख ७० हजारापेक्षा जास्त वस्तू गोळा करून त्याचा अभ्यास केला आहे. या कचऱ्याचा मोठा हिस्सा अन्नपदार्थ पेये व तंबाखूजन्य उत्पादनासाठी च्या पॅकेजिंग साठी होत होता. प्लास्टिक हे वापरण्यास सोपे जरी असले तरीही ते नष्ट होण्यास फार मोठा कालावधी लागत असल्याने त्याचे दुष्परिणाम मोठे आहेत ही बातमी नुकतीच व वाचण्यात आली. कोको कोला या कंपनीने यावर काही उपाय योजण्यास सुरवात केली आहे. जागतिक पातळीवर २०२५ पर्यंत आपले पॅकेजिंग पुन्हा शंभर टक्के वापरण्यासारखे करण्याचे व २०३० पर्यंत पॅकेजिंग मध्ये किमान ५० टक्के पुन्हा वापरण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. पेप्सिको या कंपनीने पॅकेजिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक ची रिसायकलिंग सिस्टिम अधिक कार्यक्षम करण्यासाठी निधी व वेळेची गुंतवणूक केली जात आहे. नेस्ले या कंपनीकडून सुद्धा प्लास्टिक चे प्रदूषण रोखण्यासाठी अनेक उपाय योजले जात आहेत.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१४ जून**

**१८७७ :** संगीत शारदा, संगीत संशयकल्लोख, झुंझारराव यासारखी एकापेक्षा एक अप्रतिम नाटके लिहिणाऱ्या गोविंद बल्लाळ देवल यांचा जन्म १३ नोव्हेंबर १८७७ रोजी झाला. मॅट्रिक झाल्यावर काही काळ शाळेत मास्तरकी केली. पुढे 'पण वैभव' मधून राजकीय विषयावर लेखन केले. 'कादंबरीकलाप' नावाचे मासिकही काढले. रेनॉल्ड याच्या पुस्तकाचे 'मिस्टरीझ ऑफ लंडन' चे लंडन -रहस्य पूर्वार्ध भाषांतर केले. तथापि त्यांनी नावलौकिक मिळवला तो नाट्यक्षेत्रात नट आणि नाटककार म्हणून. नाट्यपदे रचण्याचे उपजत कौशल्य त्यांना प्राप्त झाले होते. संगीत शारदा, झुंझारराव, दुर्गा, मृच्छकटिक विक्रमोर्वशीय, अशी एकापेक्षा एक सरस नाटके त्यांनी रंगभूमीला दिली. 'फाल्गुनराव' अर्थात तसबिरीचा घोटाळा' ह्या नाटकाचे पुढे 'संशयकल्लोळ' नाटकात रुपांतर त्यांच्या नाटकाची भाषा लवचिक असे. मुख्य म्हणजे त्यांनी मराठी नाटकात सामाजिक नाटकांची परंपरा सुरु केली. उदाहरणार्थ, जरठ-बालविवाहची समस्या संगीत शारदेत मांडून देवलांनी सामाजिक सुधारणांना चालना दिली. बाणभट्टाच्या 'कादंबरीतील पुंडरिक व महाश्वेता यांच्या प्रेमकथेवर आधारित 'शापसंभ्रम' हे त्यांचे नाटक रुपांतर कौशल्याचे एक उत्कृष्ठ उदाहरण आहे. नाट्य साहित्यात भरीव योगदान देणाऱ्या देवलांचे नव्या मराठी नाट्ययुगाच्या पहिल्या पर्वाचे मानकरी म्हणून किर्लोस्करांच्या बरोबरीने त्यांचे नाव आदराने घेतले जाते. १४ जून १९१६ रोजी त्यांचे निधन झाले. **१८९३:-** बेने इस्त्राएली लेखक शालोम समोएल केहीमकर यांचे निधन. केहीमकर यांना 'सेफेरा दिन : भाग १' हे हिब्रू भाषेतील प्रार्थना पुस्तकात मराठी अर्थ दिलेला आहे. तसेच गुरु मोशे यांच्या एका धार्मिक पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले आहे. **१९०३:-** 'आदिशक्तीचे विश्वस्वरुप अर्थात देवी कोशफ (चार खंड) लिहिणारे प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यांचा जन्म. याखेरीज 'देवी केकावली, हनुमानवैभव' ही पुस्तके त्यांनी लिहिली होती. **१९१५:-** लेखक, प्राचीन हिंदू संस्कृतीचे जाणकार गजानन बाळकृष्ण दंडगे यांचा जन्म. 'त्रिसुवर्णसुक्त'हे वैदिक सूक्त 'पाली-बोधिनी' हे प्राकृत व्याकरणावर 'पुरुष सुक्त' हे यज्ञ, 'चातुर्वर्ण्य', 'जाती' इ. विषयांवर तर 'ब्रम्हणस्पतिसुक्त' हे गणपती स्वरुपाचे रहस्य, 'भारतीय धर्मविचारांची बैठक', 'रुद', 'यज्ञ', 'शिव लिंग', 'रुद्राध्याय', 'विष्णुसुक्त', 'वैदिक समाज', 'शालेय अर्धमागधी', 'सौरसुक्त' आदी ग्रंथ त्यांच्या अलौकिक बुध्दीमोची साद देतात. **१९१६:-** नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल यांचे निधन. जरठ-कुमारी विवाहाच्या समस्येवर 'सं. शारदा' हे नाटक त्यांनी लिहिले. नाटकांची रुपांतरे करण्यात देवलांचा हातखंडाच होता. शेक्सपिअरकृत ऑथेल्लोचे 'झुंजारराव', थॉमस सॉदर्नच्या 'इसाबेला' किंवा 'द फॅटल मॅरेज' चे दुर्गा हे मराठीरुप तसेच मोलिएरच्या 'गानारेल' चे 'फाल्गुनराव' अशी रुपांतरे त्यांनी केली. **१९२८:-** मराठी साहित्याच्या प्रबोधन काळातील एक लेखक, टीकाकार शिवराम सिताराम वागळे यांचे निधन. 'विविधज्ञानविस्तार' मधून त्यांनी ब्रिटिश इतिहासकार बकल यांच्या ग्रंथाचा 'इतिहासशास्त्र' या नावाने अनुवाद लिहिला तसेच कवी शेखमहंमद यांच्या 'योगसंग्राम' या ग्रंथाचे संपादन केले. याशिवाय 'सिसरोकृत नितिविषयक चार निबंध', 'ब्रिटिश राज व्यवस्था', 'बेकनचे निबंध', 'शेक्सपिअरकृत हॅम्लेट' नाटकांची मराठी भाषांतरे हा टीकात्मक निबंध. 'सटवाजीराव ढमाले' हे प्रहसन, 'पुरुन ठेवलेले द्रव्य' हे ललित अशी साहित्य संपदा त्यांच्या नावावर आहे. **१९३५:-** नियतकालिकांतून कथा, काव्य, नाटिका, लेख, अशा स्वरुपाचे लेखन करणारे, मराठी शाहीर वाङ्मयाचे अभ्यासक अनंत गणेश फंदी यांचा जन्म. पेशवाईतील इतिहास प्रसिद्ध कवी अनंत फंदी यांचे ते पणतू. ह्यांचे 'कुसूमची कारवाई' या संगीत नाटकासह 'नाकारलेली मुलगी' ही लोककथा, 'बंडखोर लोककवी' हे पेशवाईतील अनंत फंदी यांचे चरित्र, तसेच 'लोककवी अनंत फंदी' ही संगीत नाटिका आणि 'स्वर्गावर स्वारी' ही भक्त प्रल्हादाच्या जीवनावर नाटिका प्रसिद्ध. **१९३६:-** लेखिका उषा शशी मेहता यांचा जन्म. 'आभास' या काव्यसंग्रहासह बालकथा, कादंबऱ्या प्रसिध्द. **१९५४:-** नाट्ययलेखक, दिग्दर्शक प्रकाश खंडेराव त्रिभुवन यांचा जन्म. 'एक होता राजा', 'थांबा, राम राज्य येत आहे' आदी नाटके त्यांची प्रकाशित झाली आहेत. **१९६९:-** कवी प्रा.सुभाष मेश्राम यांचा जन्म. 'स्थित्यंतर' हा त्यांचा कालसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९८९:-** लेखिका, संगीत व अभिनयाच्या जाणकार प्रा. सुहासिनी मुळगावकर यांचा जन्म. वृत्तपत्रातून स्फूटलेखनासह 'सदाफुली' हा ललित लेखसंग्रह त्यांचा प्रसिध्द. **२०१०:-** प्रख्यात ज्येष्ठ कादंबरीकार, इतिहाससंशोधक व पत्रकार मनोहर माळगावकर यांचे निधन. त्यांनी 'डिस्टन्ट ड्रम', 'द प्रिन्सेस', 'द डेव्हिल्स विंड', 'कान्होजी आंग्रे', 'छत्रपती ऑफ कोल्हापूर' यासारखे ग्रंथ त्यांनी लिहिले. 'इतिहास', 'लष्करातील दिवस', 'जातीयवादी राजकारण' यासारख्या विषयावर लिहिणाऱ्या मनोहर माळगावकरांनी मानवी नातेसंबंधाचाही सूक्ष्म व तरल वेध आपल्या पुस्तकांतून घेतला आहे. **२०११:-** लेखक संत तेजराम धोंडू लाभे यांचे निधन. यांचा 'जिवेत धर्म ईश्वर योग' हा अध्यात्मिक हे ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **२०१४:-** लेखक आणि देशमुख प्रकाशन संस्थेच संचालक रवींद्र गोडबोले यांचे 'महाभारत : संदर्भ आणि समन्वय', 'औरंगजेब : शक्यता आणि शोकांतिका' ही त्यांची पुस्तके त्यांच्या अभ्यासू वृत्तीची प्रचिती देतात.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ जून

१) श्रीम.शुभांगी दत्तात्रेय नाईक
वरसोली, अलिबाग, १४-६-१९४३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**स्व. मंजुलाबेन करणराज जैन, ७ वी पुण्यतिथी, पोयनाड**

**स्व. सौ. कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**

## हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रमास सुरूवात

**। पनवेल। वार्ताहर ।**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविला जात आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रम महापालिका कार्यक्षेत्रात राबविला जात आहे. महानगर पालिका पनवेल कार्यक्षेत्रात हत्तीरोग सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. तसेच हत्तीपाय रुग्णांना दिव्यांगांना प्रमाणपत्र वितरित करण्यात येणार आहे. याबरोबरच अंड वृध्दी शस्त्रक्रिया करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हत्तीरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत रँडम पध्दतीने नागरी आरोग्य केंद्र निहाय कार्यक्षेत्र निश्चीत केले आहे.

रात्री ८ ते १२ व सकाळी ६.३० ते ९ यावेळेत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. उदिष्ट पुर्ती करीता सदर कार्यक्षेत्रात साधारणतः एक वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक काळ हत्तीरोग राव सर्वेक्षण व किटक शास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येणार आहे. हा आजार असलेल्या रुग्णांना पायावर सूज येऊन पायाच्या तसेच रुग्णाच्या हालचालींवर निर्बंध येतात. रुग्ण इतरांच्या मदती शिवाय हालचाल करु शकत नाही.

# बोगस भात बियाणे केंद्रावर कारवाई

**। रोहा । वार्ताहर ।**

**शहरातील श्री सद्गुरु कृपा कृषी केंद्र या भात खरेदी केंद्रात बोगस बियाण्यांची विक्री होत असल्याने शेतकऱ्यांनी सोमवारी (ता.१०) हल्लाबोल करीत कारवाईची मागणी केली होती. त्यानुसार मंगळवारी तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांच्या आदेशानुसार, संबंधित भात विक्री केंद्रावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.**


(संग्रहित)

शहरातील श्री सद्गुरू कृपा कृषी केंद्रात विविध जातीचे भात बियाणे विक्रीसाठी आणले होते. अकोला जिल्ह्यातील महाबीज भवन कृष्णानगर येथील महाराष्ट्र शासन सिड्स कॉर्पोरेशन लिमिटेड या एजन्सीकडून तीन लाख ४२ हजार रुपये किमतीचा ५७ क्विंटल वजनाचा जया जातीचा भात असे प्रत्येकी २५ किलो वजनाच्या २४० बॅग खरेदी करून रोह्यात विक्रीसाठी आणल्या गेल्या.

पेरणीसाठी शेतकऱ्यांनी पावसाळा सुरू होण्यापूर्वीच या केंद्रावरून भाताची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. मात्र प्रत्यक्षात भाताच्या गोणीत जया जातीचा खराब भात आढळून आला. भाताच्या गोणीत माती व दगडाचे खडे, काळी कचरी, पळींज व तांदूळ असे खराब घटक आढळले. भाताच्या गोणी खरेदी केल्यानंतर पिंगळसई गावातील किसन देशमुख, भगवान शंकर देशमुख, जनार्दन दाजीबा देशमुख, जयवंत रामराव देशमुख, नंदकुमार भालेकर, सहदेव खेडेकर या शेतकऱ्यांची फसवणूक झाली असल्याचे समोर आले. बियाणे बोगस असल्याचे लक्षात येताच शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. सरकारने नेमलेल्या एजन्सीकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे समजताच शेतकऱ्यांनी घडलेला सर्व प्रकार माजी सरपंच अनंता देशमुख यांना सांगितला. देशमुख यांनी सहकार्यासमवेत कृषी केंद्रात जाऊन श्री सद्गुरू कृपा कृषी केंद्र संचालक पी. जी. सुरणकर यांना धारेवर धरले.

दरम्यान, मंगळवारी सकाळी तालुका कृषी अधिकारी यांच्या आदेशानुसार, मंडळ कृषी अधिकारी अमोल सुतार, कृषी सहायक प्रकाश राक्षिकर यांनी घटनास्थळी भेट दिली. आतापर्यंत जया जातीचा आणलेला भात व विक्री केलेला भात, खरेदी केलेल्या शेतकऱ्यांची नावे घेऊन चौकशीसाठी भाताचे काही नमुने ताब्यात घेतले आहेत. अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशासन काय कारवाई करणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

> जया जातीचे बोगस बियाणे रोह्यातील केंद्रावर विक्रीसाठी आले असून या बाबत शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे. ज्या केंद्रातून हे बियाणे विकले गेले आहे, त्या केंद्रातून चौकशीसाठी नमुने ताब्यात घेण्यात आले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.
> – महादेव करे,
> रोहा तालुका कृषी अधिकारी

## मृतांच्या वारसांना आर्थिक सहाय्य



**। माणगाव । वार्ताहर ।**

येथील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल या पतसंस्थेतर्फे अपघातात मृत पावलेल्या व्यक्तीचे वारसदार वडील तथा माणगाव पतसंस्थेचे सभासद यांना संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून आर्थिक सहाय्य देण्यात आले.

संस्थेचे सभासद किशोर जाधव यांचा मुलगा कै. केतन जाधव याचा दुचाकीवरून अपघात झाला होता. त्याच्यावर मुंबई येथील रुग्णालयात औषधोपचार सुरु असताना त्याचे निधन झाले. केतन याचे वारसदार वडील यांना आर्थिक मदत म्हणून माणगाव ग्रामीण पतसंस्थेच्या सभासद कल्याण निधीतून आर्थिक सहाय्यतेचा धनादेश संस्थेचे चेअरमन आनंद यादव, संचालक दिलीप जाधव, नरेश राजपूत, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी पत संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, लेखनिक राजेंद्र जाधव उपस्थित होते.

# शिवभक्तांवरील हल्ल्याचा निषेध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



वैष्णदेवी भक्त तसेच शिवभक्तांवर कटरा येथे अतिरेक्यांनी हल्ला केला होता. त्यावेळी अनेक भाविकांचा मृत्यू झाला असून त्या घटनेचा निषेध करण्यासाठी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांनी कर्जत येथे निदर्शने केली.

जम्मू काश्मीर येथे धार्मिक यात्रेला निघालेल्या हिंदू भविकांवर माता वैष्णोंदेवी कटरा व शिव खोडी दर्शनाला जात असतांना ९ जून २०२४ रोजी इस्लामिक जिहादी अतिरेक्यांनी भाविकांच्या गाडीवर हल्ला केला होता. त्या बसवर केलेल्या अंदाधुंद गोळीबार त्यात बस चालकासहित १० महिला तसेच बाल व इतर भाविकांची हत्या झाली होती. या घटनेचा देशात सर्व स्तरावर निषेध व्यक्त करीत आहेत. त्यासाठी कर्जत येथे विश्व हिंदू परिषद बजरंग दल कुलाबा जिल्हा आणि कर्जत प्रखंड यांनी निषेध केला. या अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हिन्दू तीर्थयात्रींना श्रद्धांजली वाहण्यासाठी कर्जत येथे एकत्र जमले होते. त्यावेळी कुलाबा जिल्हा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल प्रशासनाला निवेदने दिली. कर्जत तहसील कार्यालय तसेच पोलीस प्रशासनाला हे निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हा मंत्री साईनाथ श्रीखंडे, जिल्हा बजरंग दल संयोजक विशाल जोशी, प्रखंड अध्यक्ष विनायक उपाध्ये, बजरंग दल संयोजक नितीन पवाळी, सह संयोजक प्रतीक पाटील, हर्षल पारखी, नितीन गवसकर, वेंकटेश ठाकरे, अभिषेक तिवारी, दिनेश कडू, बापू चित्ते, शिरीष मुकादम आणि इतर बजरंग उपस्थित होते.

## तीन लाखांचा गुटखा हस्तगत

**। पनवेल । वार्ताहर।**



तीन लाख रुपये किंमतीचा गुटखा तळोजा पोलिसांनी हस्तगत केला असून याप्रकरणी हमजा खान आणि अल्ताफ खान यांच्या विरोधात गुन्हा दाखल कण्यात आला आहे. तळोजा फेज-१ परिसरात एका इमारतीच्या आवारातील गाडीमध्ये गुटखा साठवूण ठेवला होता. याची माहिती तळोजा पोलिसांना मिळताच सदर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून गाडीतील व आरोपींच्या घरातून सुमारे ३ लाख रुपये किंमतीचा गुटखा हस्तगत केला आहे. तसेच या गुन्ह्यातील गाडी सुद्धा ताब्यात घेण्यात आली आहे.

# कशेळे-खांडस रस्त्यावर अपघात

### एक गंभीर, दोन किरकोळ जखमी

### अपघातग्रस्त रिक्षाचा चक्काचूर

**। नेरळ । वार्ताहर ।**




कशेळे-खांडस रस्त्यावर पुणे येथील पर्यटकांच्या वाहनास अपघात घडला. या अपघातात एक प्रवासी गंभीर जखमी असून, दोन किरकोळ जखमी झाले आहेत. समोरून आलेल्या दोन मोटारसायकलचा अंदाज न आल्याने रिक्षा चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि रिक्षा रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खड्ड्यात उलटली. जखमींना पनवेल एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे पर्यटक पुणे देहू रोड येथून आल्याचे प्राथमिक माहितीत समजले.

कर्जत तालुका हा पर्यटन दृष्टीने फार्महाऊसचा तालुका म्हणून ओळखला जातो. विकेंडच्या काळात पुणे-मुंबई येथून पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. शनिवार ९ जून रोजी पुणे देहू रोड येथील प्रवासी पर्यटक कर्जत तालुक्यातील दुर्गम भागातील कशेळे खांडस याठिकाणी फिरण्यासाठी आले होते. दरम्यान, पर्यटकांनी आणलेली ऑटो रिक्षा या वाहनात चालक, तर दोन प्रवासी असे एकूण तीन मित्र होते. फार्महाऊसवर निघालेले हे पर्यटक कशेळे खांडस रस्त्यावरील अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स संस्थेच्या ज्ञानानुभव विद्यालय येथे आले असता रिक्षाला अपघात घडला. समोरून आलेल्या दोन मोटारसायकलचा वळणावर अंदाज न आल्याने वाहन चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि वाहन थेट रस्त्याच्या कडेला खड्ड्यात उलटून अपघात घडला. यामध्ये रिक्षाच्या मागील सीटवर बसलेल्या ५८ वर्षीय सुरेश दगडू वाघमारे या प्रवाशाच्या डोक्याला जबर मार लागल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. तर, चालक आणि अन्य दोन साथीदार हे अपघातात किरकोळ जखमी झाले होते. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# कर्जतमध्ये भातशेतीच्या कामांना सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यात भातशेतीच्या कामांना शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे. भाताची पेरणी करण्यासाठी शेतकरी वर्ग कामाला लागला असून शेतकर्त्यांकडून भाताची राब भारणीसाठी नांगर आणि ट्रॅक्टर तसेच पॉवर ट्रिलर यांच्या माध्यमातून भाताची पेरणी करण्यावर शेतकऱ्यांनी भर दिला आहे. तर काही शेतकऱ्यांनी भाताची लागवड करण्यासाठी अवजारे यांचा देखील वापर सुरु केला आहे.

अनेक बदल झाले तरी भाताच्या राबांची कामे ही प्रामुख्याने नांगराचे सहाय्याने करण्यावर शेतकऱ्यांचा भर दिसून येत आहे. त्यामुळे शेतीमध्ये कितीही बदल झाले तरी पारंपरिक भाताची लागवड करण्यावर शेतकरी आपला विश्वास दाखवत आहेत हे सध्या जागोजागी दिसून येत आहे.

कर्जत तालुक्यात भाताची शेती करण्यासाठी शेतकरी लगबगीने शेतीच्या कामात व्यस्त झाले आहेत. तालुक्यात शेतकरी भाताचे राब भरणी करण्याच्या कामांना गती देत आहेत. त्यासाठी बैलजोडीसह नांगर शेतात फिरताना दिसत आहेत.

नांगरामुळे जमिनीची उखळण चांगली होत असते. नांगराचे फाळ हे जमिनीत खोलवर जाते आणि त्याचा फायदा जमीन भुसभूशीत होण्यासाठी होत असतो. त्यामुळे नांगर वापरून नांगरणी केल्यास भाताचे बियाणे हे जमीनीमध्ये खोलवर जाते आणि त्या बियांना पक्षीदेखील खाऊ शकत नाहीत. त्यामुळे बैलजोडी सहनांगरणी महत्वाची ठरत आहे, असे शेतकऱ्यांनी सांगितले.

## मोफत डोळे तपासणी शिबीर

**चिरनेर :** पनवेल येथील डॉ. सुहास हळदीपुरकर यांच्या लक्ष्मी आय चॅरिटेबल ट्रस्ट आणि ग्रामपंचायत चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने चिरनेर गावातील श्रीराम मंदिरात नुकतेच मोफत डोळे व मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. विनोद पाचघरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीमने शिबिरात सहभाग घेतला. चिरनेर परिसरातील १०० हून अधिक स्त्री-पुरुष रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. रुग्णांना मोफत चष्मांचे वाटप केले.

# हलक्या सरींतच महामार्ग चिखलमय

### रूंदीकरणाचा वाहतुकीला फटका

**। खांब । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड-आंबेवाडी नाक्यावर उड्डाणपुलाच्या कामासाठी खोदकाम करण्यात आले आहे. या ठिकठिकाणी मातीचे ढिगारे पडले आहेत. रस्त्याच्या मधोमध पडलेल्या मोठ्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. चिखलमय रस्त्यावरून प्रवास करताना छोटी वाहने, रिक्षा, दुचाकी तसेच पादचाऱ्यांना अक्षरशः कसरत करावी लागते.

पहिल्याच पावसात रस्त्यावर पाणी तुंबल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाचे काम जवळपास १४ वर्षांपासून सुरू आहे. भूसंपादनाच्या वेळी अनेकांची दुकाने, गाळे, हॉटेलवर बुलडोझर फिरवण्यात आला. मात्र तब्बल बारा ते तेरा वर्षे उलटूनही काम अपूर्णच आहे.

ऐन पावसाळ्यात महामार्गाच्या दोन्ही बाजूला असलेला रस्ता खड्डेमय झाला आहे. पावसामुळे खड्ड्यात पाणी साचल्याने चिखलयुक्त पाणी पादचाऱ्यांच्या अंगावर उडते. रस्ता अनेक ठिकाणी पूर्णपणे उखडला आहे. तर काही ठिकाणी रस्त्यावरील डांबर निखळल्याने खड्डे आणि चिखलात दुचाकी घसरण्याचे प्रकार वाढले आहेत. लवकरात लवकर रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरणाचे बांधकाम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याने दैनंदिन प्रवास करणारे प्रवासीवर्ग व वाहनचालक यांना महामार्गावरून प्रवास करताना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी रूंदीकरणाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु, साईडपट्टीची कामे अपूर्ण असल्याने त्याचीही समस्या भेडसावताना दिसत आहे.

कोलाड ते पुई दरम्यान अपूर्णावस्थेत असलेल्या साईडपट्टीची कामे समस्येत आणखी भर घालताना दिसत आहेत. मागील आठ दिवसांपासून पावसाने बऱ्यापैकी सुरूवात केली आहे. रोहा तालुक्यातील काही भागात मागील दोन दिवसांपासून मुसळधार स्वरूपातील पाऊस कोसल्याने त्या पावसाचा फटका महामार्गावर सुरू असलेल्या रूंदीकरणाच्या कामाला चांगलाच फटका बसल्याचे दिसून येते. कोलाड ते पुई येथे मात्र दिवसातून अनेकवेळा वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली होती.

# पाण्याअभावी अंत्यविधीची अडचण

### कळंबोलीवासियांसमोरील प्रश्न

**। पनवेल । वार्ताहर ।**



कळंबोली येथील स्मशानभूमीत मागील चार दिवसांपासून पाणी पुरवठा बंद असल्याने सुदर्शन कासले (वय ५३) यांच्या अंत्यविधीला मोठी अडचण निर्माण झाली. कासले यांच्या अंत्यविधीसाठी त्यांच्या नातेवाईकांनी स्मशानभूमीत जाऊन तयारी केली, परंतु स्मशानभूमीत पाण्याची व्यवस्था नव्हती. पाणी नसल्याने अंत्यविधी कसा करावा असा प्रश्न पडल्याने कासले यांच्या नातेवाईकांनी पिण्याच्या पाण्याच्या सीलबंद बाटल्या आणून त्याव्दारे अंत्यविधी आटपला.

पनवेल महापालिकेच्या दुर्लक्षित कारभाराचा हा नमुना असून या संतापजनक घटनेनंतर कळंबोलीवासियांनी पनवेल महापालिकेच्या कारभाराविषयी समाजमाध्यमांवर संताप व्यक्त केला आहे.

अंत्यविधीनंतर आंघोळीसाठी आणि हातपाय धुण्यासाठी पाणी लागते. परंतु मागील चार दिवसांपासून या स्मशानभूमीत पाण्याच्या वाहिनीतून पाणी पुरवठा झाला नसल्याचे स्मशानभूमीतील रखवालदारांनी सांगीतले. पनवेल महापालिका नागरिकांकडून करवसूलीसाठी विविध उपाययोजना राबवित आहे. मात्र, नागरिकांना महापालिकेकडून दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा पुरविण्याकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. सध्या कळंबोली स्मशानभूमीत पालिकेने विविध बांधकामे हाती घेतली आहेत. या दरम्यान स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी येणाऱ्यांनी थांबावे कुठे यासाठी पालिकेने कोणती सोय केली नाही. पनवेल पालिकेचे प्रभाग अधिकारी व पालिका उपायुक्तांनी या स्मशानभूमीत फेरी मारल्यास त्यांना नागरिकांची होणारी गैरसोय नजरेस पडेल.

यापूर्वी पाणी पुरवठा सूरळीत होता. मात्र काही रिक्षाचालक व दुचाकी चालक हे आपापाली वाहने याच स्मशानभूमीच्या पाण्यावर धुण्याचे उद्योग करत होते. पालिकेने एका खासगी ठेकेदाराकडून अंत्यविधीचे साहीत्य विक्रीसाठी ठेवल्याचे दिसते. हे अंत्यविधीचे मोक्ष कीट साडेतीन हजार रुपयांत ठेकेदार विक्री करतो. मात्र या स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाणी उपलब्ध नसल्याची पाटी कुठेही लिहून ठेवल्याची दिसत नाही. पनवेल महापालिकेचे नवनियुक्ती आयुक्त मंगेश चितळे या प्रकरणी लक्ष घालून उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## साई मंदिराचा वर्धापन दिन

**उरण :** शिरगाव येथील श्री साईबाबा संस्थानाने २२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. प्रतिशिर्डी अशी ओळख असणाऱ्या मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापन दिना निमित्त सकाळी प्रमुख विश्वस्त माजी आमदार प्रकाश देवळे व सपना लालचंदानी यांच्या हस्ते महाभिषेक करण्यात आला. दुपारी मध्यान आरतीनंतर डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू पी. डी. पाटील यांच्या हस्ते यांच्या हस्ते केक कापण्यात आला.

# रंगीबेरंगी रेनकोट व छत्र्यांसह विविध साहित्यांनी बाजारपेठा सजल्या

**। पनवेल । वार्ताहर ।**

जूनच्या पहिल्या आठवड्यापासूनच पावसाळ्याची सुरुवात होत असते. त्यानुसार पावसाळ्याला आता सुरुवात झाली असल्याने पावसाळ्यात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंनी पनवेल परिसरातील विविध ठिकाणच्या बाजारपेठा सध्या सजल्या आहेत. बाजारांमध्ये रंगीबेरंगी छत्र्यांसह रेनकोट तसेच इतर वस्तु बाजारपेठेत दाखल झाल्या आहेत. यंदाही या वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणावर होण्याची अपेक्षा असल्याने नवीन व्हरायटी असलेल्या वस्तू मोठ्या प्रमाणावर दाखल झाल्या आहेत. यंदा जून महिन्यात पावसाने हजेरी लावल्यामुळे रेनकोट, छत्र्या, टोप्या आणि अन्य साहित्य घेण्यासाठी नागरिकांची काही प्रमाणात लगबग सुरू झाली आहे. रेनकोट, पावसाळी ड्रेसचे स्वतंत्र दालन नागरिकांना खुणावू लागले आहे.

पनवेलसह विविध ठिकाणच्या बाजारामधील दुकाने पावसाळी साहित्यांनी सजली आहेत. नोकरदार महिला व पुरुषांना छत्र्या किंवा रेनकोटची गरज लागते. मागील वर्षीचा रेनकोट यंदा पावसात कितपत टिकेल याची शाश्वती नसल्याने अनेकांनी नवीन रेनकोट, छत्र्या खरेदीकडे मोर्चा वळविला असल्याचे दिसून येत आहे. १०० ते दीड हजार रूपयांपर्यंत किंमतीचे रेनकोट बाजारात उपलब्ध आहेत. मार्केटमध्ये लहान मुलांचे आकर्षण असलेल्या रेनकोटमध्ये कार्टूनची प्रिंट असलेल्या रेनकोटची भर पडली असून त्याला मागणी आहे. छत्रीमध्ये इअर अंबरेलाचे आकर्षण मुलांमध्ये दिसून येत आहे.

मुलींमध्ये वनपीस, टूपीस आणि पोन्चोलाही मागणी आहे. खरेदीदारांमध्ये ब्रँडेड रेनकोटला सर्वाधिक मागणी आहे.

# ‘ट्रु डायग्नो पॅथॉलॉजी लॅब’चे चोंढी येथे उद्घाटन

**। अलिबाग । वार्ताहर।**

**लायन्स क्लब मांडवा संचलित ट्रु डायग्नो पॅथॉलॉजी लॅबचा उद्घाटन सोहळा चोंढी येथे नुकताच पार पडला. या लॅबचे उद्घाटन प्रथम उपप्रांतपाल एन. आर. परमेश्वरन यांच्या हस्ते करण्यात आले.**

पहिल्या टप्प्यात लायन्स क्लब मांडवाने ७ ऑक्टोबर २०२१ दिशा लॅब यांच्या सहकार्याने चोंढी येथे रक्त संकलन केंद्र सुरु सुरु केले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ८ ऑक्टोबर २०२२ रोजी या रक्त संकलन केंद्राचे रुपांतर लायन्स पॅथॉलॉजी लॅबमध्ये करण्यात आले. तीसऱ्या टप्प्यात जागेच्या स्थलांतरासह चोंढी नाक्यावर या लॅबचे रुपांतर ७ जून २०२४ ट्रु डायग्नो पॅथॉलॉजी लॅबमध्ये करण्यात आले आहे. या लॅबचे उद्घाटन प्रथम उपप्रांतपाल एन.आर. परमेश्वरन यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी जिंतेंद्र ठाकूर यांनी ईशस्तवन सादर केले. त्यानंतर प्रास्ताविक नितीन अधिकारी यांनी केले. त्यांनी लायन्स क्लब मांडवाची प्रगती आणि



लायन्स क्लब मांडवा संचलित पॅथॉलॉजी लॅबद्वारे कशी समाजसेवा करण्यात आली त्याची माहिती दिली. त्यानंतर शिरीष सातपुते, प्रियदर्शिनी पाटील, डॉ. मनीष रॉय यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रथम उपप्रांतपाल एन.आर. परमेश्वरन यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात लायन्स क्लबच्या कार्याचे कौतुक करुन या लॅबच्या माध्यमातून लायन्स क्लब मांडवाने सेवेचा आदर्श उभा केला असल्याचे सांगितले. शेवटी प्रिती यांनी आभारप्रदर्शन केले.

यावेळी लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष अभिजित गुरव, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, रिजन चेअरमन प्रियदर्शिनी पाटील, झोन चेअरमन विद्या अधिकारी, अंशुल कंपनीचे शिरीष सातपुते, किहीम ग्रामपंचायत सरपंच प्रसाद गायकवाड, डॉ. शुभदा कुडतलकर, लायन्स क्लब मांडवाचे उपाध्यक्ष जितेंद्र ठाकूर, सचिव प्रिती पाटील, खजिनदार सतीश म्हात्रे, अजय आंगणे, महेंद्र पाटील, बी.एन. कोळी, सुमीत पाटील, आदी

**निवडक**

## मोटारसायकल चोर गजाआड

**पनवेल :** पनवेलसह नवीमुंबई, खारघर परिसरात मोटार सायकल चोरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा कक्ष-२ पनवेलने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून एक लाख २२ हजार रुपये किंमतीच्या चोरीच्या ५ मोटार सायकली हस्तगत केल्या आहेत. खारघर रेल्वे स्टेशन बाहेर यशस्वी फाईन डाईन हॉटेलसमोर करण दोरे यांची मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानंतर पोलीसांनी तपास सुरु केला होता.

## कायद्याची जनजागृती

**सुधागड-पाली :** मुस्लिम सोसायटी डेव्हलपमेंट ग्रुप पाली-सुधागड यांच्यातर्फे लिमये हॉल येथे नुकतेच कायदेविषयक जनजागृती शिबीर पार पडले. यावेळी विविध कायद्यांची माहिती आणि त्याचे मार्गदर्शन तज्ज्ञ वकीलांद्वारे दिले गेले. ॲड. अजहर मुश्ताक घट्टे, ॲड. सदफ येलुकर, ॲड. हिना अकबर नारलेकर, ॲड. फरहान अ. कादिर मिसरीक, ॲड. साईम मो. हनिफ बहुर, सहाय्यक पोलीस निरीक्षक बालवडकर यांनी विविध कायद्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## तीन ठिकाणी चार्जिंग स्टेशन

**माथेरान :** सर्वाच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सनियंत्रण समितीने सध्या २० ई रिक्षांना पायलट प्रोजेक्ट म्हणून परवानगी दिली आहे. उर्वरीत ७४ नवीन ई रिक्षा लवकरच हातरीक्षा मालकांना मिळणार आहेत. ई रिक्षांना चार्जिंग करण्यासाठी एकूण तीन ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. यातील दस्तुरी नाक्यावर २, कम्युनिटी हॉल परिसरात ५ आणि नगरपरिषदेच्या आवारात ५ ई रिक्षांना चार्जिंग स्टेशनची व्यवस्था नगरपरिषदेच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

## अतिक्रमण हटवले

**रसायनी :** पाताळगंगा औद्योगिक परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरण व बाहेरील येणाऱ्या कामगार वर्गाची गरज लक्षात घेता सिध्देश्वरी कॉर्नर येथील फुटपाथ रोड लगत स्थानिक नागरिकांनी आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी छोटी-मोठी दुकाने थाटली होती. ही जागा एमआयडीसी हद्दीमध्ये येत असून या दुकांनाच्या मागील बाजूने गॅसची लाईन गेल्यामुळे सिध्देश्वरी कॉर्नर येथील अतिक्रमण एमआयडीसी प्रशासनाने नोटीस देवून बुलडोजर लावून हटविले आहे.

## कंपनीला लाखोंचा गंडा

**अलिबाग :** नार्कोटिक्स विभागाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी सांगून कंपनीला लाखो रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार रायगड जिल्ह्यातील खोपोली तालुक्यात घडला आहे. या घटनेतील टोळीतील सहा आरोपींना रायगड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यामध्ये गुजरातच्या अनेक भागातून आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून २१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या संदर्भात अधिक तपास सुरू आहे.

# विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या

■ **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र**

**। पनवेल । वार्ताहर ।**

**लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीमध्ये विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे पाठपुरावा करून नाव देण्याचा ठराव मंजूर करण्याचा आणि त्यांचे अभिनंदन करण्याचे ठरवण्यात आले आहे.**



२४ जून रोजी दि. बा. पाटील यांची पुण्यतिथी विविध समाजपयोगी कार्यक्रम राबवून साजरी करण्याचा ठराव देखील या बैठकीत करण्यात आला. बैठक कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपाध्यक्ष माजी खासदार राम शेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत आगरी समाजहॉलमध्येबुधवारीसंपन्नझाली. लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृतीसमीतीच्या बैठकीमध्ये विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याला मंजुरी लवकरात कशी मिळेल यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीसऱ्यांदा विजयाची हॅट्रीक केली आहे.

याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभीनंदन करणाचा तसेच विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा ठराव लवकरात लवकर मंजुर करण्याची विनंती पत्राद्वारे करण्याचे ठरवण्यात आले.

तसेच नव्या मंत्री मंडळामध्ये किंजरापू राममोहन नायडू हे नागरी विमान वाहतुक मंत्री झाले आहेत. त्यांच्याकडे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासंदर्भात भेट घेण्याचे ठरवण्यात आले.

दरम्यान, नागरी विमान वाहतूक राज्यमंत्रीपदी मुरलीधर मोहोळ यांची वर्णी लागली आहे. ते पुण्यात आल्यावर त्यांची भेट घेऊन त्यांना नामकरणाविषयी चर्चा करून हा विषय लवकरात लवकर मार्गी लावण्याबाबत पाठपुरावा करण्याचा ठराव करण्यात आला.

## शारदा म्हात्रे यांचे निधन

**अलिबाग :** तालुक्यातील धोकवडे येथील शेतकरी कामगार पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्या शारदा परशुराम म्हात्रे (८६) यांचे गुरुवारी (दि. ६) अल्पशा आजारामुळे निधन झाले.



त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. नथुराम म्हात्रे यांच्या त्या मातोश्री होत. गावातील स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे यांच्यासह धोकवडे ग्रामस्थ, महिलांनी, उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. शारदा म्हात्रे यांची दशक्रीया विधी १५ जून व उत्तरकार्य १६ जून रोजी होणार असल्याची माहिती म्हात्रे कुटूंबियांकडून देण्यात आली आहे.

## ग्रामस्थांनी केला विरोध

**। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय विमानतळच्या बाजूला असलेल्या पारगाव येथे सिडको प्रशासन नाले सफाई करण्यासाठी गेले होते, मात्र, पारगाव ग्रामस्थांनी त्यांना कडाडून विरोध केला. भर पावसात मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ या ठिकाणी जमले होते. त्यामध्ये महिला वर्ग सहभागी झाला होता. पारगाव ग्रामस्थांनी तत्पूर्वी सकाळी मंदिरात बैठक घेतली. आपल्या विविध मागण्याचा विचार सिडको प्रशासन करत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतप्त भावना आहेत. त्यामुळे विरोध करत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामस्थांना नोटिस पाठवण्यात आल्या आहेत, याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. याप्रसंगी सिडको अधिकारी आणि ग्रामस्थांची चर्चा झाली.



# नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी

■ **मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आवाहन**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पावसाळा सुरु झाला आहे. त्यादृष्टीने प्रत्येकाने वैयक्तीक स्वच्छतेसह आपल्या परिसरातही स्वच्छता राहिल याची काळजी घ्यावी, पाणी उकळून व गाळून प्यावे. साथीच्या आजाराची लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार सुरू करावेत. नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्या, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

### काय करावे

- **पिण्याचे पाणी उकळून थंड झाल्यावर शक्य असल्यास त्यात क्लोरिनचा वापर करून पिण्यास वापरावे**
- **अन्न पदार्थ व्यवस्थित झाकून ठेवावेत**
- **उलट्या, जुलाब, कावीळ, गॅस्ट्रो, विषमज्वर झाल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घेउन उपचार सुरू करावेत. जिल्हा परिषदेच्या व शासकीय रुग्णालयांमध्ये उपचाराची सोय उपलब्ध आहे**
- **ताप, मळमळ, चक्कर, उलटी, हगवण आदी गॅस्ट्रोची लक्षणे आढळल्यास रुग्णाला त्वरीत ओ.आर.एस. पाजावे व त्वरीत डॉक्टरांकडे जाऊन उपचार घ्यावे**
- **प्रत्येकाने वैयक्तिक स्वच्छतेचे पालन करावे**
- **नागरिकांनी आपल्या घरातील व सभोवतालचा परिसर स्वछ ठेवावा**

पावसाळ्यात पिण्याचे पाणी काही कारणाने दुषित झाल्यास कॉलरा, विषमज्वर, गॅस्ट्रो, हगवण अशा आजारांचा प्रादुर्भाव होतो. तसेच उघड्यावरील खाद्यपदार्थांवर माशा बसून ते दुषित झाल्यास उलट्या, जुलाब, कावीळ असे आजार होतात. याबाबत काही लक्षणे आढळल्यास त्वरीत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा इतर शासकीय रुग्णालयांमध्ये जाऊन उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाळ्यात उद्भवणारे आजार टाळण्यासाठी नागरिकांनी पाणी उकळून प्यावे, शुद्धीकरण न केलेले बोअरवेल किंवा विहिरीचे पाणी तसेच उघड्यावरील खाद्यपदार्थ खाणे टाळावे, पाणी स्त्रोतांचा परिसर स्वच्छ ठेवावा. अशा सूचना प्रशासनाने केल्या आहेत.

## दिनेश ठमके यांचा प्रामाणिकपणा

**। सुकेळी । वार्ताहर ।**

आजच्या काळातही अनेकजण आपले काम हे प्रामाणिक आणि तत्परतेने करत असतात. अशाच एका कार्यतत्पर पत्रकाराने प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले आहे.

एका ट्रॅक्टर चालकाचा हरवलेला १८ हजार रुपये किंम तीचा व्हिवो कंपनीचे मोबाईल बाळसई येथील पत्रकार व अनेक वर्षे जिंदाल रुग्णालयात सेवा करणारे कर्मचारी दिनेश मधुकर ठमके यांनी त्या ट्रॅक्टर चालकास परत केला.

गुरुवार १३ रोजी सकाळी दिनेश यांना वाकण पुलावरती मोबाईल पडल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तो मोबाईल आपल्या ताब्यात घेतला. काही वेळातच त्या फोनवरती त्या ट्रॅक्टर चालकाने दुसऱ्या एका फोनवरुन फोन केला.



दिनेश यांनी तात्काळ फोन उचलुन त्यांना फोन माझ्याकडे आहे तुम्ही सुकेळी येथील जिंदल रुग्णालयात येऊन माझ्याकडून फोन घेऊन जा, असे सांगितले. काही वेळातच ट्रॅक्टर चालक नवनाथ दामोदर तोरवे हे आकाश वर्मा यांना घेऊन जिंदाल रुग्णालयात आले. त्यावेळी दिनेश यांनी मोबाईल दामोदर यांना परत करत एक आपुलकीची भावना जपली. दामोदर यांनी दिनेश यांच्या प्रामाणिकपणाबद्दल आभार मानले. दिनेश यांच्या कर्तुत्वाबद्दल सर्व विभागातुन अभिनंदन होत आहे.

# ज्येष्ठांना स्मार्टफोन प्रशिक्षण

**। अलिबाग । वार्ताहर ।**

ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट फोन वारताना अडचणी येतात. यातून मार्ग काढण्यासाठी अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेच्यावतीने स्मार्टफोन वापरण्याबाबत प्रशिक्षण देण्यात आले.

पुण्याच्या आंतरराष्ट्रीय दीर्घायु केंद्रामार्फत दोन दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. हे प्रशिक्षण जेष्ठ नागरिक संस्थेच्या ल.नी. नातू सभागृहात दिनांक १० जून व ११ जून रोजी सकाळी नऊ ते बारा वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले होते.

नामवंत शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर अध्यक्ष असलेल्या या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला होता. संस्थेच्या ३५ सभासदांनी भाग घेतला होता. दीर्घायु संस्थेमार्फत सुशांत सोनवणे



हे अधिकारी व नंदकुमार सकट, यशोदा पाध्ये यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले.

या प्रशिक्षणवर्गातव्हाट्सअपचा वापर, स्मार्टफोनमधील सुविधा, अत्यावश्यक असलेले ॲप्स, फोन वापरताना घ्यावयाची काळजी, फोनची बॅटरी दीर्घकाळ टिकावी म्हणून घ्यावयाची दक्षता, फोन हरविल्यास प्रथम काय करावे याचे मार्गदर्शन, ई-मेलचा वापर कसा करावा, आर्थिक व्यवहार करताना कसे सावध राहावे, आदी मार्गदर्शन करण्यात आले.

दीर्घायु ही संस्था सोळा देशात सामाजिक कार्य करीत असून त्या ठिकाणी संस्थेची कार्यालये आहेत. ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश पालकर यांच्या माध्यमातून हे प्रशिक्षण आयोजित केले होते.

ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष प्रफुल्ल राऊत यांनी आभार मानून प्रशिक्षणाची सांगता केली.

## आदिवासी बांधवाच्या सतर्कतेमुळे मुलगी वाचली

**। उरण । वार्ताहर ।**

चिरनेर गावातील रहिवासी महादेव चंद्रकांत डोईफोडे यांच्या कन्येला पळवून नेण्याचा प्रयत्न मंगळवारी अज्ञात इसमाने (दि.११) केला होता. परंतु आदिवासी बांधवांच्या सतर्कतेमुळे तो प्रयत्न असफल झाला.

यासंदर्भात उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मुले पळविणाऱ्या इसमाचा शोध उरण पोलीस घेत आहेत. चिरनेर गावातील रहिवासी असणारे महादेव चंद्रकांत डोईफोडे हे मंगळवारी ( दि. ११) सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास आपल्या दोन मुलांसह गावातील रस्त्यावर फेरफटका मारायला गेले होते. काही वेळाने ते आपल्या घरी परत होते.

त्यांचा मोठा मुलगा हा घरी गेला तर ९ वर्षाची देवश्री ही कन्या त्यांच्या मागून चालत येत होती. महादेव हे घराजवळ गेले असता त्यांची कन्या मागून येताना दिसली नाही. त्यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला असता कन्येच्या पायातील बूट रस्त्यावर पडलेले निदर्शनास आले.

त्याच दरम्यान भयभीत अवस्थेत देवश्री ही कन्या येताना दिसली. यावेळी सदर कन्येने झालेला प्रकार आपल्या वडिलांना सांगितला. या घटनेची माहिती शेजाऱ्यांना कळताच शेजाऱ्यांनी मुले पळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इसमाचा शोध सुरू केला. तर त्याच रस्त्यावरुन येणाऱ्या भरत राम जाधव यांनी माहिती देताना सांगितले की, एक इसम लहान मुलीला उचलून तीचा तोंड दाबून घेऊन जात होता आम्हाला वाटल की तो त्या मूलीचा बाप असेल म्हणून आम्ही दुर्लक्ष केले.

मात्र सदर मूलीनी काका मला वाचवा अशी ओरड केली. मुलीला सोड असा आवाज दिला. त्याच दरम्यान सदर मूलीने त्या इसमाच्या हातावर जोरदार चावा घेऊन त्यांच्या तावडीतून सुटून पळ काढला. आम्हाला कल्पना नसल्याने आम्ही मुलीच्या मागे धावत आलो. एकंदरी मुलीच्या धाडसामूळे व भरत जाधव या आदिवासी बांधवांमूळे सदर कन्या सुखरूप आपल्या आई-वडिलांना पुन्हा सापडली आहे.

मुले पळविणाऱ्या इसम चारचाकी वाहनासह सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे.

# वीजपुरवठा खंडित नेरळकर संतप्त

■ **अधिकाऱ्यांना घातला घेराव**

**। कर्जत । वार्ताहर।**

नेरळमधील सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळेनेरळकर संतप्त झाले आहेत. त्या प्रकाराला वैतागून नेरळकरांनी महावितरण कार्यालयात अधिकाऱ्यांना घेराव घालून चांगलेच धारेवर धरले. त्यानंतर महावितरणचे अधिकारी सुरेश हिंगणकर यांनी गैरसोयीबाबत दिलगिरी व्यक्त करत उपाययोजना करू, असे सांगितले.

पर्यटनाच्या दृष्टीने वाढत चाललेला कर्जत तालुका काही वर्षापासून विविध समस्याने ग्रासला आहे. त्यातच मान्सून सुरू होण्यापूर्वीच महावितरणकडून विजेचा खेळखंडोबा सुरू आहे.

नेरळ शहर झपाट्याने वाढले आहे. मात्र विजेच्या लपंडावामुळे लोक मेटाकुटीला आले आहेत. त्यामुळे चिडलेल्या ग्राहकांनी थेट महावितरणच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला.



नेरळ शहर व परिसरात रात्री-बेरात्री केव्हाही कुठलीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जातो. यावरून नेरळमधील ग्राहकांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरले.

अधिकारी, कर्मचारी फोन उचलत नाहीत म्हणून व्यापारी संघटनेचे सचिव विशाल साळुंके यांनी प्रश्न उपस्थित करत शहरातील वीजवाहिन्या भूमिगत करण्याची मागणी केली, तर शिवसेना तालुका सचिव अंकुश दाभेणे यांनी वाढते शहरीकरण लक्षात घेऊन जास्त क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसवण्याची मागणी केली. बाजारपेठेत ट्रान्सफॉर्मर बसवावा, याकडे व्यापारी संघटनेचे अरविंद कटारिया यांनी लक्ष वेधले.

व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मनोहर अहिरे यांनी प्रत्येक वार्डमधील ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवण्याची गरज असल्याचे म्हटले. तसेच शहरात वाढलेली झाडे पावसाळ्यात तुटून वीजपुरवठा खंडित होतो, असे पंढरी हजारे यांनी सांगितले.

अचानक वीजपुरवठा बंद होत असल्यामुळे विजेवर चालणाऱ्या उपकरणांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. याची नुकसानभरपाई कोण करणार, असा सवाल यावेळी नागरिकांवी उपस्थित केला.

## रमेश कांबळे यांना पितृशोक

**अलिबाग :** तालुक्यातील वरसोली - विजय नगर येथील मुरलीधर आनंदा कांबळे (८५) यांचे मंगळवारी (दि.११) सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. वृत्तपत्राचे छायाचित्रकार रमेश कांबळे यांचे ते वडील होत. मुरलीधर कांबळे यांचा स्वभाव मनमिळावू होता. ते स्पष्टवक्ता होते. मंगळवारी सकाळी राहत्या घरातच निधन झाले. सायंकाळी बुरूमखान येथील स्मशानभूमीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप नाईक, लायन्स क्लबचे सभासद महेंद्र पाटील यांच्यासह अनेक क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून श्रध्दांजली अर्पण केली.

## जिल्ह्यात रमाई योजनेंतर्गत १ हजार ९२२ घरे पूर्ण

**। अलिबाग । वार्ताहर ।**

राज्यातील गरीब आणि वंचित असलेल्या घटकांसाठी रमाई ही योजना लागू केली आहे. सात वर्षात जिल्ह्यात शबरी योजनेंतर्गत ३ हजार ६९७ तर रमाई योजनेंतर्गत १ हजार ९२२ घरे पूर्ण झाली आहेत.



लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे अद्याप २०२४-२५ चे उद्दिष्ट आलेले नाही. कमी उत्पन्न असल्यामुळे हे नागरिक स्वतःचे घर घेऊ शकत नाहीत आणि अशा परिस्थितीत या लोकांना कच्च्या घरात किंवा झोपड्यांमध्ये राहावे लागते. या बाबींचा विचार करून शासनाने शबरी योजना लागू केली आहे.

रायगड जिल्ह्यात सात वर्षांत रमाई योजनेचे २५५२ घराचे उद्दिष्ट्य देण्यात आले होते. त्यापैकी २,३४४ घरे मंजूर होऊन १,९२२ घरे पूर्ण झाली आहेत. ४२२ घराची कामे सुरू आहेत. शबरी योजनेत सात वर्षात ६,६१० घराचे उद्दिष्ट आले होते. यापैकी ६,४८० घरकुलांना मंजुरी देऊन ३,६९७ पूर्ण झाली आहेत.

२,७८३ घरांचा प्रश्न विविध कारणांनी रखडला आहे. २०२४- २५ चे उद्दिष्ट लोकसभा आचारसंहितेमुळे आलेले नाही. शबरी, रमाई योजनेचा लाभ घेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासनाकडे अर्ज करायचा आहे. अर्ज ऑफलाईन आणि ऑनलाईनही करता येतो. योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६**
- **अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ.अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# ई-केवायसीसाठी गावपातळीवर विशेष मोहीम

■ **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना**

**। अलिबाग । वार्ताहर ।**

**प्रधानमंत्री किसान योजनेअंतर्गत ई-केवायसी करण्यासाठी गावपातळीवर ५ ते १५ जून या कालावधीत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेमध्ये योजनेचा १७ वा हप्ता वितरणापूर्वी लाभार्थी शेतकऱ्यांनी नोंदणी, ई-केवायसी, बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता करून घेण्याचे आवाहन शेतकरी बांधवांना करण्यात आले आहे.**

शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत सरसकट सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) दोन हजार रुपये प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी सहा हजार रुपये लाभ अदा करण्यात येतो. या योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची पूर्तता राज्यातील ९० लाख २० लाभार्थ्यांनी केलेली आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार ५ जून ते १५ जून या कालावधीत या बंधनकारक बाबींची उर्वरित लाभार्थींनी पूर्तता करण्यासाठी गावपातळीवर विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेमध्ये लाभार्थींची स्वयं नोंदणी व ई-केवायसीसाठी राज्यातील सर्व सामाईक सुविधा केंद्र, तर आधार संलग्न बँक खाती उघडण्यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँक यांनाही सहभागी करुन घेण्यात आले आहे. आले आहे.



त्यानुसार भूमी अभिलेख नोंदीनुसार जमिनीचा तपशील अद्ययावत न केलेल्या, बँक खाती आधार संलग्न व ई-केवायसी न केलेल्या लाभार्थींनी सदर बाबींची पूर्तता या विशेष मोहिमेमध्ये करून घ्यावी, तसेच भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत नसलेल्या लाभार्थींनी संबंधित तलाठी, तहसील कार्यालयामध्ये संपर्क साधावा. त्याचप्रमाणे ई-केवायसी व बँक खाती आधार संलग्न करणे यासाठी अनुक्रमे नजीकच्या सामाईक सुविधा केंद्र व इंडिया पोस्ट पेमेंट बँकेमार्फत कार्यपूर्तता करावी, असे विकास पाटील, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविले आहे. योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असणाऱ्या सर्व लाभार्थ्यांनी प्रशासनाने केलेल्या कागदपत्रांची लवकरात लवकर पुर्तता करावी. यासाठी गावपातळीवर मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# जनावरांची तस्करी पोलिसांनी रोखली

## अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ कळंब रस्त्यावरील माले गावाच्या हद्दीत एका टेम्पो मधून तीन गोवंशीय जनावरे यांची तस्करी सुरू होती.नेरळ पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचून तो टेम्पो आणि टेम्पोमधील तीन गोवंशीय जनावरे यांची यशस्वी सुटका केली आहे. यावेळी पोलिसांनी टेम्पो सह तब्बल अडीच लाखांचा माल जप्त केला आहे.

नेरळ पोलीस ठाण्याचे हद्दीत असलेल्या चिकनपाडा माले रस्त्यावर गोवंशिय जनावरे यांची तस्करी करण्यात येणार असल्याची माहिती नेरळ पोलीस यांना खबरी कडून मिळाली होती. त्यानुसार ११ जून २०२४ रोजी सकाळी ०७.४५ वाजता माले गावाच्या हद्दीत टेम्पो क्रमांक एम-एच. ४६-बि.यु.-७२६१ हा टेम्पो हा गोवंशीय जनावरे घेऊन जाणार आहे. या खबरीनुसार नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पोलिसांची एक टीम तयार केली आणि सापळा रचला. त्यावेळी पोलिसांच्या धाडीमध्ये टेम्पो आणि टेम्पो चालक तसेच गोवांशीय जनावरे ताब्यात घेतली. गाडीचा चालक यासीम युनिस सुरमे हा चिकनपाडा येथील राहणारा असून त्याची चौकशी केली असता गाडीतील गोवंशीय जनावरे त्यांनी चोरून आणली आणि कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. पकडण्यात आलेल्या तीन गोवंशीय जनावरे यांचा रवानगी नेरळ कोमलवाडी येथील गोशाळेत करण्यात आली. तसेच टेम्पो आणि अन्य साहित्य अशी एकूण २,४५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी पोलीस हवालदार नवनाथ म्हात्रे आणि अन्य पोलीस कर्मचारी यांनी केली. सदर गुन्ह्याची नोंद नेरळ पोलीस ठाणे येथे १३२/२०२४ प्रमाणे झाली आहे. तर आरोपीवर भा.द.वि. ३६९ सह प्राणी स्वंरक्षण कायदा कलम ५(अ), ५ (ब) चे उलंघनल ९ सह प्राण्यांना कृरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११, (१), (घ), (ड), (ज) प्रमाणे नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद केला. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी कायदा आणि सुव्यवस्था यांचे दृष्टीने कारवाई करताना गोवंशीय जनावरांचे कत्तलीपासून रक्षण केले आहे.

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल **श्री. सोमनाथ अशोक म्हात्रे** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक **सौ. सुमन रामदास बागडे** यांचे वतीने अखत्यारी म्हणून श्री. अनिल दत्तात्रेय कडव यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. आंबिवली बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २४ | १/अ | ०-२८-६० | १-६९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल साठेकरार व खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १४/०६/२०२४

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.- ९३२५०६००३७

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ट**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. ईश्वर महादेव चव्हाण<br>२) श्री. चंद्रकांत अखिलेशकुमार त्रिपाठी | ४५ | ४ | ३-८१-०० | २ | ५० |
| पैकी हे.आर.-पॉ. १-२०-०० इतके क्षेत्र | | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १४/०६/२०२४
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेलः- adv.jayeshmhase@gmail.com

---

### जाहीर नोटीस


तमाम लोकांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मौजे- पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड सुगवे ग्रामपंचायतीचे हद्दीतील दुय्यम निबंधक कर्जत यांच्या हद्दीतील सर्व्हे नं ६३ हिस्सा नं. १० एकूण क्षेत्र १.०३.०० हे. आर. प्र पैकी आमचे अशिल कुसुम महादेव पाटील रा घर नं. २३४ वहाल, उलवे नोड, सेक्टर २३, हनुमान मंदिर पोस्ट- वहाळ, ता- पनवेल, रायगड, ४१०२०६ यांनी ३५ गुंठे जागा व इंदिरा नाथा पाटील घर नं ९६० मोरावे, उलवे नोड, सेक्टर ३, दत्त मंदिर पोस्ट- वहाळ, ता. पनवेल, रायगड, ४१०२०६ यांनी २० गुंठे जागा अशी एकुण ५५ गुंठे जागा आकार ०.६९ रू. पै अशी मिळकत आमचे अशिलांनी १. श्री शरद शांताराम पालांडे २. सागर शरद पालांडे ३. स्नेहल शरद पालांडे सर्व रा रूम नं २, मिश्रा चाळ, खदुस कपांउड, गावदेवी रोड, पोइनसर कांदिवली (ईस्ट) ४००१०१ यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेत आहेत. सदरच्या मिळकतीचे टायटल चोख असल्याचे मालकांनी हवाला दिलेला आहे. म्हणून सदर मिळकतीचे टायटल व्हेरीफिकेशन करीता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. तरी सदरच्या मिळकतीसबंधीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे हक्क हितसंबंध, गहाण, बक्षीस, लिज, तारण, पोटगी, करार, व्यवस्था, विक्री, हस्तांतरण, देवाण-घेवाण, आदि हस्तांतरण, अभि हस्तांतरीत, दान, न्याय, भाडेपट्टा, मासिक, कुळ वहिवाट, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भागीदार, संयुक्त साहस, वारसहक्क, धारणाधिकार अथवा कोर्टजप्ती, टाच व अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क, वहिवाट, दावा, हुकूमनामा, आदेश, कोणतेही अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून २१ दिवसांचे आत आपल्याकडील हक्क दर्शविणाऱ्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे त्याप्रमाणे न केल्यास सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत अगर असल्यास ते सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व व्यवहार पूर्ण झाल्यानंतर हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**ॲड. सायली शरद श्रीखंडे**
पत्ता : निसर्गदर्शन सोसा, ब्लॉक नं. ६,
नेरळ ग्रामपंचायत समोर, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नंबर ९८८१४४५५२६/९०२८६२८४१२

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-09/ 24-25 7000031448 | Supply of various size of clamp and, connectors along with Nut Bolts at various substations under EHV (O&M) Division Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- + GST** | **Rs.24.90 Lakhs** |
| Tend-10/ 24-25 7000031458 **2nd call** | Providing of additional jumper (T-clamp with jumper cone) of 220kV Uran - Ulwe - Kharghar line on urgent basis under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- + GST** | **Rs. 68.45 Lakhs** |
| Tend-13/ 24-25 7000031471 | Supply of SIEMENS make 220kV GIS Bays spare alongwith service of attending of emergency/breakdown at 220kV GIS Wadkhal substation under EHV (O&M) Division Panvel. **Tender Fee Rs. 5000/- + GST** | **Rs. 259.17 Lakhs.** |
| Tend-14/ 24-25 7000031510 **2nd call** | Work of chemical cleaning of porcelain portion of 400kV & 220kV EHV equipments (CB, CT, PT Insulator string, LA etc.) at 400kV R.S. Nagothane S/stn. EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- + GST** | **Rs.57.22 Lakhs** |

**EMD 1% of estimated cost, submission of bids from 13.06.2024 to 21.06.2024 at 11:00 hrs, Opening date: 21.06.2024 at 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer(Adm) Tel No. 022- 27459624, Mob. No. 9769006131. E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

---


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


---

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १२७/१ ह्या शेतजमिन मिळकतीपैकी १-००-०८ (हे.आर.) शेतजमिन मिळकत, श्री. मिथील शांतीलाल जैन, राहणार अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील जमिन मिळकतीपैकी ०-३०-०० आर्स शेतजमिन मिळकत रस्त्याच्या हक्कासहीत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. मिथील शांतीलाल जैन, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सोगांव, ता.अलिबाग | १२७/१ | ८-०४-४०<br>०-२१-५० पो.ख.<br>८-२५-९० एकूण | १६२-२४ |

वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीमधील श्री. मिथील शांतीलाल जैन यांच्या मालकीची १-००-०८ (हे.आ.) शेतजमिन मिळकत असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ०-३०-०० (हे.आ.) शेतजमिन मिळकत रस्त्याच्या हक्कासहीत.

अलिबाग,
दिनांक : १३/०६/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. : /०२/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. भास्कर तात्या सावंत
वय ७७ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. मु. केस्टुली, पो. नांदवी,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नांदवी,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. भास्कर तात्या सावंत यांचे आजोबा कै. सुंदर बंधू सावंत हे दि. ०५/०१/१९४७ रोजी मौजे नांदवी, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १०/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे आजोबा कै. सुंदर बंधू सावंत हे दि. ०५/०१/१९४७ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. भास्कर तात्या सावंत यांचे आजोबा कै. सुंदर बंधू सावंत हे दि. ०५/०१/१९४७ रोजी मौजे नांदवी, ता. माणगाव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १३/०६/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२४ दिनांक :- /०६/२०२४

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत)**

**जाहीर नोटीस**

अर्जदार कुसुम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. गोंधळपाडा, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड यांनी श्री. किशोर जयरामदासद तलरेजा, जमिनमालक व विकासक, पत्ता कृष्णा बिल्डींग, चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ४१/१/ड/७ क्षेत्र ४२७.०० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरच्या नोटीस Not Delivered Door Locked अशा शेरा मारुन परत आलेल्या असल्याने त्यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावीत कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २७/०६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १३.०६.२०२४

सही/-
(प्र.का. जगताप)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

---

महाराष्ट्र शासन
**महसुल व वनविभाग**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड
दूरध्वनी क्रमांक-०२९४०-२६९३१७ फॅक्स- २६९०४२ Email ID- tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१२१०/२०२४ दि.१२/०६/२०२४

**जाहीर नोटीस मसुदा**

१. पांडूरंग रामदास जगताप
मु. पिटसई ता. तळा जि. रायगड — अर्जदार

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यू वविवाह नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत पिटसई
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती तळा — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांचा भाऊ विनोद रामदास जगताप यांचा जन्म दि. ०१/०७/१९८९ रोजी मोजे पिटसई ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. १९/०१/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा विनोद रामदास जगताप यांचा जन्म दि. ०१/०७/१९८९ रोजी जन्म झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचा भाऊ विनोद रामदास जगताप याचे जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१२ जून २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(मंगेश पालांडे)**
कार्यकारी दंडाधिकारी तळा

---

महाराष्ट्र शासन
**महसुल व वनविभाग**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि.रायगड
दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२ Email ID- tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/ जाहिर नोटीस/१२५७/२०२४ दि.१२/०६/२०२४

**जाहीर नोटीस मसुदा**

१. पांडूरंग रामदास जगताप
मु. पिटसई ता. तळा जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत पिटसई
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती तळा — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांचा भाऊ देवदास रामदास जगताप यांचा जन्म दि.०५/०८/१९८५ रोजी मौजे पिटसई ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यांनी तसा दाखला अर्जदार यांना दि.१३/०२/२०१४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा भाऊ देवदास रामदास जगताप यांचा जन्म दि.०५/०८/१९८५ रोजी जन्म झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचा भाऊ देवदास रामदास जगताप याचे जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याचीसंबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१२ जून, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(मंगेश पालांडे)**
कार्यकारी दंडाधिकारी तळा

---

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. : - ८५/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. वाजीद शौवकत अल्ली राऊत
वय ४४ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. वाजीद शौवकत अल्ली राऊत यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि.०६/०३/१९७९ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. २२/०३/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०६/०३/१९७९ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. वाजीद शौवकत अल्ली राऊत यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०६/०३/१९७९ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगाव
ता. १२/०६/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. पूजा सुभाष साळवे रा. ब्लॉक नं. १ तळमजला गावठाण राळेगावसिद्धी, अहमदनगर यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आम च्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| पालव (रेवदंडा) ता. अलिबाग | ४०/२ (जुना गट नं. २२७/२) | ०-३१-००<br>पो.ख.०-००-००<br>एकूण ०-३१-०० | ०.६४ |
| पालव (रेवदंडा) ता. अलिबाग | ४३/७ (जुना गट नं. २३०/७) | ०-३०-२६<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-३०-२६ | ०.६५ |

वर नमूद केलेल्या मिळकती ह्या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १३/०६/२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड,

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे भोईरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ४८/२ | ०.३३.०० | ४.०३ |

यापैकी श्री. अशोक बाळकृष्ण पाटील व श्री. निलेश अशोक पाटील यांच्या हिश्श्याचे ०.२२.०० हे.आर.पॉ. क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १४/०६/२०२४

सही /-
**ॲड. प्रणित शिवराम भिंगारदिवे**
कर्जत, २०२, 'बि' विंग,
श्रीधर अपार्टमेंट, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो. नं. ९५९४९३०८८९

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मालकाचे नाव : १) नामदेव तुकाराम पाजणे**
**रा.मु.पो मालुक, ता. तळा जि. रायगड**

| मौजे | गट. नं | भो.ग.वर्ग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| मालुक | ११८/१/ब | १ | ०.५५.००<br>०.३२.००<br>०.८७.०० | ०.२५ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही तकार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

माणगांव
दिनांक :- १३/०६/२०२४

सही/-
**(ॲड.पी. एम. जाधव)**
बी.कॉम.एल.एल.बी
मु. तळाशेत (इंदापूर)
लक्ष्मी निवास, ता. माणगाव, जि. रायगड
मो.नं. ७२१९५४६०९७

**निवडक**

## सौरभमुळे शेअर्समध्ये वाढ

**न्युयॉर्क :** सौरभ नेत्रावळकरने टी-२० विश्वचषकामध्ये चांगली कामगिरी केली आहे. तो ओरॅकल कंपनीत प्रिंसिपल मेंबर ऑफ टेक्निकल स्टाफ पदावर कार्यरत आहे. ओरॅकल कॉर्पचे अमेरिकेतील शेअर आणि ओरॅकल फायनेशियलचे भारतातील शेअर वाढले आहेत. न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजमध्ये बुधवारी ओरॅकल कॉर्पचे शेअर्स १३.३२ टक्क्यांनी वाढला. हा शेअर १४०.३८ डॉलरवर बंद झाला. ही कंपनी एक अमेरिकेची मल्टीनॅशनल कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी कंपनी आहे.

## गावसकरांची कोहलीवर टीका

**नवी दिल्ली :** भारताचे माजी कर्णधार सुनिल गावसकर यांनी आयपीएलदरम्यान अनेकवेळा विराट कोहलीवर टीका केली होती. विराट कोहलीचा सलामीवीर म्हणून स्ट्राईक रेट हा कमी असल्याचे अनेक जाणकारांचे म्हणणे होते. ज्यावेळी भारतीय संघ निवडीची चर्चा सुरू होती त्यावेळी विराट कोहलीचा हा संथपणा चर्चेत होता. विराट भारताच्या टी-२० संघात बसत नाही असे देखील मत जाणकार व्यक्त करत होते. आता विराटच्या खराब काम गिरीनंतर गावसकर यांनी त्याच्यावर टिका केली आहे.

## संघावर देशद्रोहाचा आरोप

**लाहोर :** पाकिस्तानचा संघ युएसएकडून आणि भारताकडून पराभूत झाला आहे. त्यांनी कॅनडाविरूद्ध सामना जिंकला असला तरी त्यांचे पुढच्या फेरीतील स्थान जर तरवर अवलंबून असणार आहे. दरम्यान, पाकिस्तान संघाच्या अडचणीत अजून वाढ झाली आहे. पाकिस्तान संघाचा एक वकील चाहता खूपच नाराज झाला आहे. पाकिस्तानच्या गुजरानवाला भागातील या वकिलाने पाकिस्तान संघावर थेट देशद्रोहाखाली खटला चालवण्यात यावा यासाठी याचिका दाखल केली आहे.

## स्कॉटलँडविरूद्ध सेटींग?

**न्युयॉर्क :** ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज जॉश हेजलवूडने ऑस्ट्रेलिया स्कॉटलँडविरूद्धच्या सामन्यात सेटिंग करणार असल्याची हिंट दिली. या सामन्यानंतर इंग्लंडचे आव्हान ग्रुप स्टेजमध्येच संपुष्टात येण्याची शक्यता आहे. हेडलवूड म्हणाला की, या स्पर्धेत इंग्लंडविरूद्ध पुन्हा एकदा सामना होण्याची शक्यता आहे. तो सर्वोत्तम संघापैकी एक संघ आहे. आम्ही टी-२० मध्ये यांच्याविरूद्ध संघर्ष करतो. त्यांना आम्ही स्पर्धेतूनच बाहेर काढू शकलो तर विश्वचषक जिंकण्याची चांगली संधी आहे.

## स्टेडियमवर इम्रान खानचे टी-शर्ट

**न्युयॉर्क :** युएसएमध्ये सुरू असलेल्या टी-२० विश्वचषकात पाकिस्तानला पाठींबा देण्यासाठी अमेरीकेच्या स्टेडियमवर चाहत्यांची गर्दी होत आहे. याचवेळी काही पाकिस्तानी चाहत्यांनी पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या समर्थनात काही पोस्टरबाजी केली. इम्रान खान यांचे समर्थन करणारे टी-शर्ट घालून देखील चाहते आले होते. त्यानंतर नासाऊ स्टेडियममधील आयसीसी सुरक्षा अधिकाऱ्यांनी या चाहत्यांना इम्रान खानच्या समर्थनात घातलेले टी-शर्ट काढायला लावले.

# भारताची विजयी घोडदौड सुरूच



## 7 अमेरिकेवर गडी राखून विजय

### अर्शदीपने रचला इतिहास

भारताचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने टी-२० विश्वचषकात इतिहास रचला आहे. रोहितने पहिले षटक टाकण्याची जबाबदारी अर्शदीप सिंगवर सोपवली. या पठ्ठ्याने देखील पहिल्याच चेंडूवर बळी घेत भारताला धडाकेबाज सुरूवात करून दिली. विशेष म्हणजे टी-२० विश्वचषक इतिहासात सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर बळी घेणारा अर्शदीप सिंग हा भारताचा पहिलाच गोलंदाज ठरला आहे.

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वकरंडकातील 'अ' गटातील लढतीत अमेरिका संघावर सात गडी राखून विजय मिळवला. सलग तिसऱ्या विजयासह भारतीय संघाने 'सुपर आठ' फेरीमध्ये प्रवेश केला आहे. अर्शदीप सिंग (४/९) व हार्दिक पांड्या (२/१४) यांची प्रभावी गोलंदाजी व सूर्यकुमार यादव (नाबाद ५०), शिवम दुबे (नाबाद ३१) यांच्या शानदार फलंदाजीच्या जोरावर भारताची विजयी घोडदौड सुरू आहे.

**सुपर आठमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध भिडणार**

या सामन्यात मुंबईकर असलेला पण अमेरिका संघाकडून खेळत असलेल्या सौरभ नेत्रावळकर याने विराट कोहली (०) व कर्णधार रोहित शर्मा (३) यांना झटपट पॅव्हेलियनमध्ये पाठवून चमक दाखवली. विजयासाठी १११ धावा काढायच्या निर्धाराने मैदानात उतरल्यावर भारतीय संघाची सुरुवात धक्कादायक झाली. चांगली फलंदाजी करीत असलेल्या रिषभ पंतला सरपटी चेंडूने बाद केले. चेंडू खूप खाली राहत असल्याने धावा जमा करणे कठीण वाटत असताना सूर्यकुमारचा झेल नेत्रावळकरने सोडला. संघाला गरज असताना सूर्यकुमार आणि दुबेची जोडी जमली. अमेरिका संघाने दोन षटकांदरम्यान खूप वेळ घेतल्याने दंड बसून भारतीय संघाला पाच अतिरिक्त मोलाच्या धावा मिळाल्या. १७व्या षटकात सूर्यकुमारने ठेवणीतील फटके मारत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

दरम्यान, नाणेफेक जिंकून रोहित शर्माने गोलंदाजी करायचा निर्णय घेतला. सामना चालू झाल्यावर पहिल्याच चेंडूवर अर्शदीप सिंगने शायन जहांगिरला पायचित केले आणि शेवटच्या चेंडूवर अँड्रियस गौसला बाद केले. या सामन्यात कप्तानी करणारा ॲरोन जोन्सला कमी वेगाचा आखूड टप्प्याचा चेंडू टाकून हार्दिक पांड्याने चकवून झेलबाद करवले. सलामी फलंदाजीला आलेला स्टीव्हन टेलर २४ धावांवर अक्षर पटेलने बाद केले. हार्दिक पांड्याने टाकलेल्या बाऊन्सरवर षटकार मारताना नितीश चुकला ते केवळ त्याबाजूची सीमारेषा लांब होती म्हणून. सिराजने नितीशचा पकडलेला झेल अफलातून होता. टाकलेल्या प्रत्येक षटकात अर्शदीप सिंगने भेदक मारा करून फलंदाजांना बाद करायचा सपाटा लावला होता. अर्शदीप सिंग आणि हार्दिक पांड्याने मिळून सहा फलंदाजांना बाद केल्याने २० षटकांच्या अखेरीला अमेरिकन धावफलक ८ बाद ११० धावांवर रोखला गेला.

२५ व्या सामन्यात भारताने अमेरिकेचा पराभव करून सुपर-८ साठी पात्रता मिळवली. या विजयासह भारतीय संघाचा सुपर-८ मध्ये २४ जून रोजी सेंट लुसिया येथील डॅरेन सॅमी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना होणार हे जवळपास निश्चित झाले आहे.




### मुंबईच्या सौरभचा विक्रम

अमेरीकेचा स्टार वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावलकरने भारताविरुद्ध अप्रतिम गोलंदाजी केली. या सामन्यात सौरभने विराट कोहलीविरुद्ध एक खास विक्रमही केला आहे. त्याने भारताची रन मशिन विराट कोहलीला शुन्यावर बाद केले. सौरभने पहिल्याच चेंडूवर विराटला क्षेत्ररक्षकाकडे झेल देण्यास भाग पाडले. आता आयसीसी स्पर्धेत कोहलीला गोल्डन डकवर बाद करणारा सौरभ पहिला गोलंदाज ठरला आहे. यानंतर पुढच्याच षटकात सौरभने मुंबईकर रोहित शर्माला देखील पॅव्हेलियनची वाट धरायला लावली.

# शार्दुल ठाकूरवर शस्त्रक्रिया

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारताचा स्टार वेगवान गोलंदाज शार्दुल ठाकूर याच्यावर नुकतीच शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. याबद्दल त्याने सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली आहे. शार्दुल ठाकूरच्या उजव्या पायाच्या घोट्याची लंडनमध्ये शस्त्रक्रिया झाली आहे. शार्दुलने शस्त्रक्रियेनंतरचा फोटो शेअर केला असून त्याला कॅप्शन दिले आहे की, 'यशस्वी शस्त्रक्रिया जून २०२४ वि. मे २०१९'. खरंतर २०१९ मध्येही शार्दुलला शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागले होते.



यावर्षाच्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिका दौऱ्यावेळी शार्दुलच्या दुखापतीने डोके वर काढले होते. पण त्यानंतरही त्याने खेळणे मॅनेज केले होते. त्याने मुंबईला ४२व्यांदा रणजी ट्रॉफी जिंकून देण्यात मोलाचा वाटाही उचलला होता. तसेच, तो आयपीएल २०२४ मध्येही चेन्नई सुपर किंग्सकडून खेळला. दरम्यान, आयपीएलनंतर पुन्हा देशांतर्गत क्रिकेटचा हंगाम सुरू होण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी आहे. सप्टेंबरमध्ये भारतातील देशांतर्गत क्रिकेटचा नवा हंगाम सुरू होईल. त्यामुळे तोपर्यंत शार्दुलला विश्रांतीची संधी आहे. त्याला या दुखापतीतून बाहेर येण्यासाठी साधारण तीन महिन्यांचा काळ लागण्याची शक्यता आले. त्यामुळे तो सप्टेंबर-ऑक्टोबर दरम्यान पुन्हा क्रिकेट खेळताना दिसू शकतो. पण त्याच्या पुनरागमनाबाबत अद्याप अधिकृत भाष्य करण्यात आलेले नाही.

# विश्वचषकाच्या 'ड' गटात मोठी उलथापालथ

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका-नेपाळ यांच्यातील टी-२० विश्वकरंडकातील 'ड' गटातील सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करण्यात आला. याचा फटका २०१४ मध्ये टी-२० विश्वकरंडक पटकावणाऱ्या श्रीलंका संघाला बसला. याचसोबत नेपाळ संघाचेही नुकसान झाले. दोन्ही संघांचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आल्यात जमा आहे. श्रीलंका व नेपाळ या दोन्ही संघांना 'सुपर आठ' फेरीमध्ये पोहोचण्याची अंधुकशी आशा आहे; पण यासाठी 'ड' गटातील पुढील लढतींचे निकाल त्यांच्या बाजूने लागण्याची गरज आहे. त्यामुळे सध्या तरी श्रीलंका व नेपाळ हे संघ जर तरच्या समीकरणावर अवलंबून राहणार आहेत. दक्षिण आफ्रिका संघ 'ड' गटामध्ये सलग तीन विजयांसह एकूण सहा गुण मिळवून पहिल्या स्थानावर विराजमान आहेत. बांगलादेश व नेदरलँड्स या दोन्ही संघांनी प्रत्येकी दोन गुणांची कमाई केली आहे; पण सरस नेट रनरेटच्या जोरावर बांगलादेश दुसऱ्या स्थानावर असून नेदरलँड्सचा संघ तिसऱ्या स्थानावर आहे. नेपाळ व श्रीलंकन संघांनी प्रत्येकी एक गुणांची कमाई केली असून नेपाळचा संघ चौथ्या व श्रीलंकन संघ पाचव्या स्थानावर आहे.

श्रीलंकेला इतर लढतींच्या निकालांवरही अवलंबून राहावे लागणार आहे. बांगलादेश-नेदरलँड्स यांच्यामधील सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द झाल्यास याचा फायदा श्रीलंकेला होणार आहे. श्रीलंकेला आगेकूच करता यावी, यासाठी दक्षिण आफ्रिकेने नेपाळला हरवणे गरजेचे आहे. तसेच, नेपाळने बांगलादेशवर विजय मिळवणेही तेवढेच आवश्यक आहे. दक्षिण आफ्रिका वगळता इतर सर्व संघांचे समान गुण झाल्यास ज्या संघाचा नेट रनरेट अधिक असेल त्या संघालाच घोडदौड करता येणार आहे.

# रायगडच्या अमृता भगतला सुवर्णपदक

**। रायगड । प्रतिनिधी ।**

गंगानगर राजस्थान येथे दि.६ ते ९ जून या कालावधीत राष्ट्रीय सब ज्युनिअर आणि ज्युनिअर क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत ४७ किलो वजनी गटात रायगडची आंतरराष्ट्रीय पदक विजेती अमृता ज्ञानेश्वर भगत हिने सुवर्णपदक प्राप्त केले. अमृताच्या या यशाबाबत तिचे प्रशिक्षक विक्रांत गायकवाड यांनी आनंद व्यक्त केला आहे. जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये अमृताने ठसा उमटवून राष्ट्रीय स्पर्धेत सुद्धा पदक प्राप्त केले. त्याबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सहसचिव सचिन भालेराव, तसेच सदस्य माधव पंडित, सुभाष टेंबे, सचिन भालेराव, दत्तात्रय मोरे, खजिनदार राहुल गजरमल यांनी अभिनंदन केले आहे.



# आयपीएलच्या व्यावसायिक मूल्यात वाढ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलमध्ये कोलकाताने विजेतेपद पटकावले. शाहरूख खान या फ्रेंचायजीचा मालक असून या संघाने तिसऱ्यांदा आयपीएलवर आपले नाव कोरले आहे. गेल्या काही वर्षापासून आयपीएलची व्यावसायिक मुल्य चांगलेच वाढले आहे. हौलीहान लॉकी या ग्लोबल इनव्हेस्टमेंट बँकेने आपल्या मागील आहवालात आयपीएलचे व्यासायिक मुल्य हे ६.५ टक्क्यांनी वाढले असल्याचे सांगितले. तर ब्रँड व्हॅल्यू ही ६.३ टक्क्यांनी वाढली आहे. विशेष म्हणजे या अहवालात आयपीएलमधील फ्रेंचायजींच्या ब्रँड व्हॅल्यूची देखील माहिती दिली आहे.



बँकेच्या प्रेस रिलीजमध्ये सांगण्यात आले आहे की, महौलीहान लॉकी इंडियाने आज आयपीएलच्या ब्रँड व्हॅल्यूबाबतचा अभ्यास प्रकाशित केला आहे. हा आयपीएलच्या व्यावसायिक आणि ब्रँड व्हॅल्यूचा सखोल अभ्यास आहे. बँकेच्या अहवालानुसार, आयपीएलचे व्यावसायिक मुल्य हे १६.४ बिलियन युएस डॉलरपर्यंत पोहचले आहे. हे मुल्य गेल्या वर्षीच्या तुलनेत ६.५ टक्क्यांनी वाढले. भारतीय रूपयात याचे मुल्य १ लाख ३५ हजार कोटींच्या जवळ पोहचते. यावरून आयपीएलची जागतिक स्तरावरील वाढती ताकद दिसून येत आहे. याचबरोबर आयपीएलची ब्रँड व्हॅल्यू देखील ६.३ टक्क्यांनी वाढली आहे.

# जॉश हॅझलवूडची फॉरमॅटवर टीका

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्थ ।**

ऑस्ट्रेलियाने टी-२० विश्वचषकातील साखळी फेरीच्या लढतीत घवघवीत यश संपादन केले. तीन विजयांसह त्यांनी 'सुपर आठ' फेरीतही प्रवेश केला आहे. मात्र, साखळी फेरीतील या कामगिरीचा 'सुपर आठ' फेरीत कोणताही फायदा होणार नाही. हॅझलवूड म्हणाला, साखळी फेरीत सर्व सामन्यांत विजय मिळवून चांगला नेट रनरेट ठेवल्यानंतरही याचा फायदा 'सुपर आठ' फेरीत होणार नाही. अशा नियमांचा टी-२० विश्वकरंडक पहिल्यांदाच आयोजित केला जात आहे, याचे आश्चर्य वाटत आहे.

# वेस्ट इंडिजची शानदार कामगिरी

**। त्रिनिदाद । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाच्या २६व्या सामन्यात वेस्ट इंडिज संघाने शानदार कामगिरी करत न्यूझीलंडचा १३ धावांनी पराभव केला. त्रिनिदादच्या ब्रायन लारा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिज संघाने रदरफोर्डच्या शानदार खेळीमुळे १४९ धावा केल्या. याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाने सातत्याने गडी गमावले आणि त्यामुळे त्यांना पराभव पत्करावा लागला.

या टी-२० विश्वचषकात वेस्ट इंडिजचा हा सलग तिसरा विजय आहे. यासह त्याचे ६ गुण झाले आहेत




आणि तो टी-२० विश्वचषकाच्या सुपर ८ फेरीसाठी पात्र ठरला आहे. भारत, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियानंतर ही फेरी गाठणारा तो तिसरा संघ ठरला आहे. न्यूझीलंडचा हा सलग दुसरा पराभव आहे. यामुळे टी-२० विश्वचषकाची पुढील फेरी गाठण्याची त्यांची शक्यता कमी दिसत आहे. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिज संघाची सुरुवात खूपच खराब झाली. वेस्ट इंडिजचा निम्मा संघ ६.३ षटकांतच पॅव्हेलियनमध्ये पोहोचला होता. यावेळी धावसंख्या केवळ ३० धावांवर होती. अशा परिस्थितीत रदरफोर्डने जबाबदारी घेतली. त्याला समोरून फारशी साथ मिळाली नसली शानदार फलंदाजी केली. रदरफोर्डने अवघ्या ३९ चेंडूत ६८ धावा करत वेस्ट इंडिजची धावसंख्या १४९ धावांपर्यंत नेली.

**भारत-पाक सामना संपताच पोचले बुलडोझर**

# न्यूयॉर्कच्या स्टेडियमचे काय ?

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

आयसीसीने टी-२० विश्वचषकासाठी न्यूयॉर्कमध्ये तात्पुरते क्रिकेट स्टेडियम उभारले होते. या स्टेडियमवरील सर्व सामने संपले आहेत. त्यामुळे आता हे स्टेडियम नष्ट करण्यात येणार आहे. येथे विश्वचषकातील एकूण ८ सामने खेळले गेले. विशेष म्हणजे, यापैकी एकही सामना मोठ्या खेळीचा नव्हता. यावरून आयसीसीवर टीकाही करण्यात आली आहे.

हे स्टेडियम तयार करण्यासाठी आयसीसीने सुमारे २५० कोटी रुपये खर्च केले. हे स्टेडियम १०६ दिवसांत पूर्ण झाले होते. मात्र, हे तात्पुरते स्टेडियम असल्याने ते आता पाडण्यात येणार आहे. बुधवारी (दि.१२) झालेल्या भारत विरुद्ध अमेरिका सामन्यानंतर स्टेडियम पाडण्याचे काम सुरू झाले, जे सुमारे ६ आठवड्यांत पूर्ण होईल. सामना संपल्यानंतरच स्टेडियम उद्ध्वस्त करण्यासाठी बुलडोझर आले होते. पुढील



महिन्याअखेरीस या स्टेडियमचा मागमूसही उरणार नाही. मात्र येथे ड्रॉप-इन खेळपट्ट्या राहतील का? ते अद्याप ठरलेले नाही.

आयसीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, जर नासाऊ काउंटीच्या अधिकाऱ्यांना या खेळपट्ट्या त्याच ठिकाणी ठेवायच्या असतील आणि त्यांची देखभाल होत असेल, तर त्या तेथे राहू शकतात. अन्यथा या खेळपट्ट्या पुन्हा दुसरीकडे नेल्या जातील. तसेच, एका वृत्तानुसार मेजर लिग क्रिकेटमध्ये मुंबई इंडियन्सच्या संघाचा बेस न्यूयॉर्कमध्ये आहे. यामुळे येथे अंबानी नजीकच्या भविष्यात नवीन स्टेडियम बांधण्याची अपेक्षा आहे.

# पाकिस्तान संघाचा जीव भांड्यात

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने टी-२० विश्वचषकाच्या ग्रुप स्टेजमधील सामन्यात अमेरीका विरूद्धच्या विजयाबरोबरच सुपर ८ मधील आपले तिकीट निश्चित केले. भारताच्या या विजयाने पाकिस्तानला मात्र मोठा दिलासा मिळाला आहे. टी-२० विश्वचकात पाकिस्तानचा संघ खराब कामगिरी करत आहे. त्यांना अमेरीका आणि भारताकडून पराभव पत्करावा लागला होता. या दोन पराभवांमुळे त्यांचे सुपर-८ मधील प्रवेश लटकला आहे. त्यांना भारत-अमेरीका सामन्यात



काय होते यावरही त्यांचे गणित अवलंबून होते. अमेरीकेला फक्त एक सामना जिंकायचा होता. मात्र, भारताने अमेरीकेला चांगल्या पद्धतीने मात दिल्याने पाकिस्तानचे आव्हान एक दिवस का असेना अबाधित राहिले आहे. मात्र, असे असले तरी अमेरीकेने आयर्लंडला मात दिली तर पाकिस्तानचे सुपर ८ गाठण्याचे स्वप्न भंगणार आहे.

अमेरीका चार गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांचे नेट रनरेट हे +०.१२७ इतके आहे. मात्र, भारताने अमेरीकेचा पराभव केला अन् पाकिस्तानने कॅनडाचा पराभव केल्यानंतर चित्र थोडे बदलले आहे. पाकिस्तानचे नेट रनरेट हे +०.१९१ इतके झाले आहे. हे अमेरीकेपेक्षा चांगले नेट रनरेट आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या सुपर-८च्या आशा वाढल्या आहेत. मात्र, तर अमेरीकेने आयर्लंडचा पराभव केला तर पाकिस्तानचा खेळ खल्लास होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)